



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

समर्थ

# गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

मंगळवार, दि. ०६ जानेवारी २०२६






मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०५० | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


# सत्ताधारी पक्षातील बलाढ्य उमेदवार गडगंज

## शिंदे गटाचे बहुतांश उमेदवार कोट्यधीश; संपत्तीत अवघ्या नऊ वर्षात 5 ते 10 पटीने वाढ



**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे महापालिका निवडणुकीच्या रिंगणात सत्ताधारी पक्षाचे बहुतांश उमेदवार कोट्यवधीच्या संपत्तीचे मालक आहेत. यातील सर्वाधिक उमेदवार शिंदे गटातील असून अनेक उमेदवारांच्या संपत्तीमध्ये सुमारे नऊ वर्षात तब्बल पाच ते १० पटीने किंवा त्यापेक्षाही जास्त पटीने वाढ झाली आहे. शिंदे गटाचे किसननगर भागातील माजी नगरसेवक योगेश जाणकर यांची २०१७ च्या महापालिका निवडणुकीत स्थावर आणि जंगम मालमत्ता १ कोटी ८ लाख २७ हजार ९७४ रुपये इतकी होती. त्यामध्ये वाढ होऊन ५९ कोटी ७१ लाख २२ हजार २९२ रुपये इतकी झाली. तर माजी महापौर मिनाक्षी शिंदे यांची जंगम आणि स्थावर मालमत्ता अवघी ४३ लाख २० हजार रुपये इतकी होती. त्यामध्ये वाढ होऊन ती ५ कोटी १५ लाख ३ हजार ४९४ इतकी झाली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे बंधू प्रकाश शिंदे यांच्या संपत्तीत जवळपास २० पटीने वाढ झाली. शिंदे गट आणि काही भाजपच्या उमेदवारांच्या उमेदवारांच्या मालमत्तेत अशीच वाढ झालेली दिसते.ठाणे महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली असून उमेदवारांच्या नामनिर्देशन पत्र उपलब्ध झाले आहेत.

### युतीच्या बलाढ्य उमेदवारांची आर्थिक बळकटी

| उमेदवार | २०१७ | २०२६ |
|---|---|---|
| राम रेपाळे | १,८४,९०,००० | ७,९७,६२,११५. |
| योगेश जाणकर | १,०८,२७,९७४ | ५९,७१,२२,५९२ |
| विकास रेपाळे | १,२०,००,००० | ५,६३,९२,७७५ |
| अमित सरैय्या | ४,०७,२०,९३३ | २६,२२,३२,०२५ |
| कांचन चिंदरकर | ३,५३,००,००० | ७,१६,९५,४५० |
| मालती रमाकांत पाटील | २,०१,६७,७९४ | ११,२६,०७,११९ |
| मनोज शिंदे | ७,७७,००,००० | २९,१८,५४,६४२ |
| प्रकाश शिंदे | २,१६,२९,८१२ | २१,५३,५८,४३५ |
| सिद्धार्थ ओवळेकर | १,२५,७०० | १,७३,७०,७०९ |
| अर्चना मणेरा | ५,६३,८३,५०० | ११,३४,०२,५१८ |
| सिद्धार्थ पांडे | निवडणूक लढविली नाही | ९,४९,५०,३२२ |
| परिषा सरनाईक | ३८७३६४२८८ | ३८१८८९३५३८ |
| हनुमंत जगदाळे | ४६,३९,५०,८८९ | ६३,४४,७९,१६८.०३ |
| राजेंद्र फाटक | निवडणूक लढविली नाही | ५,३८,३२,३२२ |
| उषा भोईर | १२,१९,१७,१०१.१७ | २९,५३,९७,४८३.१६ |
| संजय भोईर | १२,१९,१७,६९५.०३ | २९,५३,९७,४८३.१६ |
| सपना भोईर | निवडणूक लढविली नाही | १४,६८,१४,४८०.३६ |
| कृष्णा पाटील | २२,८७,९३,३६७ | ५१,२०,७१,३४१ |
| नारायण पवार | ६,७४,९१,४१४ | ९,२८,२५,२१० |

# विद्यार्थी चळवळीतून थेट निवडणुकीच्या रिंगणात

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत यंदा तरुण नेतृत्वाची जोरदार चर्चा रंगताना दिसत आहे. त्यातच अवघ्या २२ वर्षांच्या सई थोपटे हिच्या उमेदवारीने राजकीय वर्तुळाचं लक्ष वेधून घेतलं आहे. पुण्यातील प्रभाग क्रमांक ३६ (क) मधून भारतीय जनता पक्षकडून सई थोपटे हिला महानगरपालिकेचं अधिकृत तिकीट देण्यात आलं असून, ती सध्या महाराष्ट्रातील सर्वात तरुण उमेदवार ठरली आहे. सई थोपटे सध्या पुण्यातील नामांकित Symbiosis महाविद्यालयमध्ये बीबीएच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत आहे. रोजच्याप्रमाणे कॉलेजचा वर्ग सुरू असतानाच तिला पक्षाकडून फोन आला आणि उमेदवारी जाहीर झाल्याची माहिती मिळाली. अचानक मिळालेल्या या बातमीने सईचा आनंद गगनात मावेनासा झाला. वर्गातील मित्र-मैत्रिणींनी तिचं अभिनंदन केलं आणि त्यानंतर सई थेट आपल्या प्रभागात पोहोचली. विद्यार्थिनी असतानाच थेट निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा हा क्षण तिच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरला.

# ‘बिनविरोध’च्या तक्रारीत तथ्य आढळल्यास नव्याने निवडणूक?

## ६९ प्रकरणांची चौकशी, ‘नोटा’चे काय?

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

महापालिका निवडणुकीत जवळपास ६८ उमेदवार ‘बिनविरोध’ निवडून आल्याची गंभीर दखल राज्य निवडणूक आयोगाने घेतली असून, ‘बिनविरोध’ प्रकरणातील तक्रारीत तथ्य आढळल्यास त्या प्रभागाची निवडणूक रद्द करून तिथे नव्याने निवडणूक प्रक्रिया राबवली जाईल, असे राज्य निवडणूक आयोगातील वरिष्ठ सूत्रांनी सांगितले. जिथे बिनविरोध निवडणूक झाली आहे, तिथे संबंधित महापालिका आयुक्तांना स्वतंत्र चौकशी करण्याचे आदेश आयोगाने दिले आहेत.

ठाणे आणि कल्याण-डोंबिवलीत उमेदवारांच्या बिनविरोध निवडीची चौकशी करावी, चौकशी पूर्ण होईपर्यंत निकाल जाहीर करू नये, अशी मागणी मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी सोमवारी राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांना भेटून केली. या भेटीनंतर आयोगाने महापालिका आयुक्तांकडून अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्याचे जाधव यांनी सांगितले. बिनविरोध जागांवर प्रत्यक्ष मतदान घ्यावे आणि मतदारांना ‘नोटा’ची संधी द्यावी, अशी मागणी होत आहे. परंतु, नियमानुसार एकच उमेदवार असेल तेथे निवडणूक घेता येत नाही. न्यायालयाने आदेश दिले तरी अंमलबजावणी या निवडणुकीत होणार नाही, असे सूत्रांनी सांगितले.




राज्य निवडणूक आयोगाने महापालिका निवडणुकांत आतापर्यंत बिनविरोध निवडून आलेल्या अंदाजे ६९ प्रकरणांची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. एखाद्या प्रभागातून एकमेव उमेदवार निवडणूक लढवत असेल आणि त्या परिस्थितीत मोठ्या संख्येने मतदारांनी ‘नोटा’ (वरीलपैकी कोणीही नाही) हा पर्याय निवडला तर अशावेळी निकाल काय असेल, हे स्पष्ट करावे, अशी विनंती जाधव यांनी याचिकेत केली.

# शरद पवार पक्ष पुढे नेणार, की पुतण्यासोबत जाणार?

## मनपा निवडणुकीनंतर आगे आगे देखो होता है क्या!



**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

ज्येष्ठ नेते शरद पवार आज ८५ वर्षांचे आहेत. अस्तित्वाच्या पातळीवर त्यांचा पक्ष आज एका निर्णायक टप्प्यावर येऊन ठेपला आहे. पुतणे अजित पवार यांच्यासोबत ते जातील की, पुढच्या काळातही आपला पक्ष, सहकारी यांना सोबत ठेवून पुढे जातील, याबाबतची आणखी स्पष्टता महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर नक्कीच येईल.

लोकसभा निवडणुकीत त्यांच्या पक्षाला दमदार यश मिळाले, एकूण ४८ पैकी आठ खासदार जिंकले; पण साडेचार महिन्यांनी झालेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांच्या पक्षाला २८८ पैकी केवळ १० जागा मिळाल्या. ज्येष्ठांपैकी जयंत पाटील, वरिष्ठांपैकी जितेंद्र आव्हाड असे काही शिलेदार महायुतीच्या झंझावातातही टिकले.

नव्या पिढीपैकी रोहित पवार, रोहित पाटील यांनी पक्षाच्या दारुण पराभवानंतरही पक्षाकडे काही प्रमाणात का होईना पण तरुण नेतृत्व आहे, असा थोडा का होईना; पण विश्वास दिला; मात्र या दारुण पराभवाच्या धक्क्यातून शरद पवार यांचा पक्ष आजही सावरू शकलेला नाही. २०१९ मधील महायुतीच्या प्रयोगाचे शिल्पकार हे शरद पवारच होते. २०२२ मध्ये एकनाथ शिंदे बाहेर पडले आणि उद्धव ठाकरे सरकार कोसळले. त्यानंतर वर्षभरातच अजित पवारांनी भाजपला साथ देत काकांचे बोट सोडले. विधानसभा निवडणुकीत तब्बल ४१ आमदार निवडून आणत पुतण्याने काकांवर मात केली.

नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्षांचा दहाचा आकडादेखील शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला पार करता आला नाही. त्या तुलनेने अजित पवारांच्या पक्षाने पाचपट चांगले यश मिळविले. नगरपरिषदेला काका-पुतणे एकत्र आले नव्हते; मात्र महापालिकेने हा चमत्कार घडवून आणला. आता तो महापालिकेपुरताच अपवाद आहे की, काकांचा पक्ष पुतण्याच्या पक्षाच्या मार्गावरूनच पुढे जाणार तेही पुढच्या काळात उलगडत जाईल. राष्ट्रवादीतील बंड हे काका-पुतण्याने ठरवून केलेले होते, असे अनेक जणांना आजही वाटते. ते दोघे वेगळे नाहीतच असा तर्कही अभ्यासक देतात.

# एमआयएम पक्षाची मान्यता रद्द करा

- ओवेसींना देशाबाहेर हाकला
- नवनीत राणा संतापल्या
- म्हणाल्या- पाकिस्तानमध्ये जाऊन दहा नाही, तर वीस मुलं जन्माला घाला



**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

देशातील राजकीय वातावरण आधीच तापलेले असताना भाजप नेत्या नवनीत राणा आणि एमआयएम अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांच्यातील वादाने नवे वळण घेतले आहे. काही दिवसांपूर्वी नवनीत राणा यांनी एका मौलानाच्या वक्तव्याचा संदर्भ देत हिंदूंना उद्देशून केलेले आवाहन मोठ्या प्रमाणावर चर्चेत आले. जर ते 19 मुलं जन्माला घालत असतील, तर आपणही किमान चार मुलं जन्माला घातली पाहिजेत, असे वक्तव्य त्यांनी केले होते. या विधानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर झपाट्याने व्हायरल झाला आणि त्यावरून देशभरात तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या. या वक्तव्याने लोकसंख्या, धर्म आणि राजकारण यांचा संगम असलेला वाद पुन्हा एकदा केंद्रस्थानी आणला.

नवनीत राणांच्या या वक्तव्यावर एमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांनी अमरावतीतील जाहीर सभेत जोरदार पलटवार केला. त्यांनी उपरोधिक शैलीत नवनीत राणांना डिवचत, तुम्ही चार नाही, तर आठ मुलं जन्माला घाला, आम्हाला त्याचं काहीही देणंघेणं नाही, असे म्हटले. मात्र, ओवैसी यांचा रोख केवळ विधानावर नव्हता, तर त्या मागील राजकीय हेतूंवर होता. अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे देशातील लोकांचे लक्ष महागाई, बेरोजगारी, शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या मूलभूत प्रश्नांवरून हटवले जात आहे, असा आरोप त्यांनी केला. द्वेषाचे राजकारण करून समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा ठपकाही त्यांनी ठेवला.

ओवेसींच्या या टीकेनंतर आता नवनीत राणा यांनी अधिक आक्रमक भूमिका घेत प्रत्युत्तर दिले आहे. त्यांनी थेट असदुद्दीन ओवेसी यांच्या राष्ट्रनिष्ठेवर आणि घटनात्मक भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. डेमोक्रेसी बदलत चालली आहे, यावर ओवेसींनी बोलले पाहिजे. या देशात राहायचे असेल, तर संविधान मानावे लागते, असे म्हणत त्यांनी ओवैसींवर गंभीर आरोप केले. केवळ वक्तव्यापुरते न थांबता, त्यांनी ओवैसींचे नागरिकत्व रद्द करून त्यांना पाकिस्तानला पाठवावे, अशी थेट मागणी करत वादाला अधिक धार दिली.

नवनीत राणा यांनी आपल्या वक्तव्यात ओवेसींवर अनेक मुद्द्यांवरून हल्ला चढवला. पाकिस्तानमध्ये जाऊन दहा नाही, तर वीस मुलं जन्माला घाला, असे म्हणत त्यांनी टोला लगावला. ओवेसींच्या मनात काय विचार चालले आहेत, हे आम्हाला माहिती आहे, असा दावाही त्यांनी केला. तुम्ही संसद सदस्य आहात, डेमोक्रेसीवर बोला. पण तुम्ही संविधानाला मानत नाही, भारत माता की जय म्हणत नाही, वंदे मातरम बोलत नाही, असे म्हणत त्यांनी ओवैसींच्या देशप्रेमावरच प्रश्न उपस्थित केला. मग तुम्ही या देशाला काय मानता? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.



# मुरूम उत्खननाची तात्काळ एटीएस मोजणी करावी

- तहसीलदारांचे राघवा कन्स्ट्रक्शनला लेखी पत्र
- कार्यवाही केली जाणार असल्याचाही खुलासा



**तामसा : (समर्थ गांवकरी)**

वानवाडी, वारकवाडी (ता. हदगाव) येथील शेत गट नंबर २२६, २२८ व २३३ या ठिकाणावरून हैदराबाद तेलंगणा येथील राघवा कन्स्ट्रक्शन यांनी रेल्वे कामाकरिता मुरूम उत्खनन करण्याकरिता जिल्हास्तरावरून तात्पुरता मुरूम गौण खनिज परवाना मिळविला होता. परंतु परवानगी पेक्षा जास्त उत्खन्न झाले असल्याच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी आल्याने राघवा कन्स्ट्रक्शन विरुद्ध कार्यवाही केली जाणार असून त्या ठिकाणावरची एटीएस मोजणी करण्यात यावी असे लेखी पत्र येथील तहसीलदारांनी राघवा कन्स्ट्रक्शन यांना लोहा सज्जाचे ग्राम महसूल अधिकारी यांच्या मार्फत दिले आहे. तामसा व ग्राम महसूल अधिकारी सज्जा लोहा यांचे अहवाल ९ सप्टेंबर च्या अनुषंगाने शेत गट क्रमांक २२६ व २२८ मध्ये रेल्वे कामाकरिता करण्यात येत असलेल्या मुरूम उत्खननाच्या अनुषंगाने या गट क्रमांक ची एटीएस मोजणी करून मोजणीचा अहवाल सादर करण्याबाबत उपअधीक्षक भूमी अभिलेख हदगाव यांना कळविण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने उपअधीक्षक भुमि अभीलेख हदगाव यांनी सर्वे नंबर हे सर्व खाजगी असल्यामुळे सदर गटाचा रीतसर मोजणी फीचा भरणा करून ऑनलाईन मोजणीचा अर्ज केल्यानंतरच संबंधित गट नंबरच्या मोजणी प्रकरणात मोजणीची तारीख देऊन मोजणी काम केले नंतर ऑनलाईन मोजणी नकाशा तयार करून संबंधित उत्खणनाचे उत्खणन क्षेत्राचा मोजणी नकाशा जीआयएस आधारीत तयार करून सादर करता येईल याकरिता सदर गट नंबर मधील गौण खनिज उत्खणनाच्या सर्वे नंबर चा तात्काळ मोजणी फीस भरणा करून ऑनलाईन मोजणी अर्ज करणे या संबंधित शेतकरी व कंत्राटदारास कळविण्याबाबत या कार्यालयास विनंती केली आहे. आपणास जिल्हास्तरावरून देण्यात आलेल्या मांडवा वारकवाडी/ वानवाडी येथील गट क्रमांक २२६, २२८ व २३३ तात्पुरता मुरूम गौण खनिज परवाना अनुषंगाने अतिरिक्त उत्खणन करण्यात येत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून या कार्यालयास प्राप्त होत आहेत. तसेच त्या अनुषंगाने संबंधित मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांनी अहवाल या कार्यालयात सादर केले आहेत. त्या अनुषंगाने आपल्या मार्फत सदर गटात करण्यात आलेल्या उत्खणनाच्या अनुषंगाने एटीएस मोजणी करून परवाणगीपेक्षा जास्त उत्पन्न झाले असल्यास नियमानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्याचे तहसीलदारांनी राघवा कन्स्ट्रक्शन यांना लेखी पत्राद्वारे कळविले आहे. वानवाडी येथे आपल्या मार्फत उत्खणन करण्यात आलेल्या गट नंबर २२६,२२८ व २३३ च्या अनुषंगाने सर्वे नंबरची मोजणी फीस भरणा करून ऑनलाइन मोजणी अर्ज तात्काळ उपअधीक्षक भूमी अभिलेख हदगाव यांच्याकडे सादर करून त्यांच्या मार्फत सदर सर्वेची ईटीएस मोजणी तात्काळ करून घ्यावी व त्याबाबतचा अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा असेही तहसीलदारांनी लेखी पत्राद्वारे कळविले आहे. हदगाव हिमायतनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी याबाबत विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित करून त्या राघवा कन्स्ट्रक्शन विरुद्ध कार्यवाही करावी, केलेल्या अधिकच्या उत्खणनाची ईटीएस मोजणी करून त्यांच्याविरुद्ध दंडात्मक कार्यवाही करून त्यांच्याकडून दंड वसूल करावा अशी मागणीही त्यांनी लावून धरली होती.

## रोटरी क्लब ऑफ नाशिकचा बाळशास्त्री जांभेकर जीवन गौरव पुरस्कार अभय सुपेकर यांना जाहीर

**मंगळवारी वितरण- पत्रकारांचाही होणार सन्मान**

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या रोटरी क्लब ऑफ नाशिकच्या वतीने पत्रकार दिनाच्या निमित्ताने दैनिक सकाळच्या उत्तर महाराष्ट्र आवृत्तीचे संपादक अभय सुपेकर यांना चौथा जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती रोटरी क्लब ऑफ नाशिकचे अध्यक्ष डॉ. गौरव सामनेरकर आणि पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ. संतोष साबळे यांनी दिली. येत्या मंगळवारी (दि. ६) रोजी सायंकाळी पाच वाजता रोटरी क्लबच्या गंजमाळ येथील सभागृहात हा दिमाखदार सोहळा पार पडणार आहे. गेल्या ८१ वर्षांपासून रोटरी क्लब ही संस्था समाजाच्या विकासासाठी कार्य करीत आहे. सामाजिक, शैक्षणिक, कृषी, क्रीडा, आरोग्य, शिक्षण अशा विविध क्षेत्रांत समाजाभिमुख काम करणाऱ्या या संस्थेने आजवर नाशिक जिल्ह्यातील अनेक भागांत लोकाभिमुख उपक्रम राबविले आहेत. विशेषत: ग्रामविकासावर भर दिला आहे. या कार्यात माध्यमांचे योगदानही महत्त्वाचे राहिले आहे. म्हणूनच समाजाचे आपण देणे लागतो या भावनेतून रोटरी क्लबतर्फे मागील चार वर्षांपासून पत्रकार क्षेत्रातील ज्येष्ठ संपादक असलेल्या व्यक्तीचा सन्मान करण्याच्या भावनेतून दरवर्षी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर जीवन गौरव पुरस्कार प्रदान केला जातो. हा चौथा पुरस्कार दैनिक सकाळच्या उत्तर महाराष्ट्र आवृत्तीचे संपादक अभय सुपेकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. दैनिक सकाळचे माजी संपादक संचालक तथा ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान केला जाईल. श्री. सुपेकर यांनी वयाच्या १९८८ पासून आपल्या पत्रकारितेला सुरुवात केली होती. गेल्या साडेतीन शतकाहून अधिक काळ ते दैनिक सकाळ वृत्तपत्रात कार्यरत आहेत. आपल्या निर्भिड आणि समाजभान जपणाऱ्या पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. रोटरी क्लबच्या गंजमाळ येथील सभागृहात येत्या मंगळवारी सायंकाळी साडेपाच वाजता होणाऱ्या या कार्यक्रमास माध्यम क्षेत्रातील मान्यवर तसेच नाशिककरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन रोटरीचे अध्यक्ष डॉ. गौरव सामनेरकर, सचिव रेखा पटवर्धन, मकरंद चिंधडे, जनसंपर्क संचालक विद्युलता तातेड, मंथ लीडर भूषण अमृतकर, रेणुका गोरीयंतल, मंथ डायरेक्टर मोना सामनेरकर आदींनी केले आहे.

## राज्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये क्रिडा शिक्षकांची ४,८६० पदे मंजूर

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



राज्यातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना आता शारीरिक शिक्षण व क्रीडा मार्गदर्शन मिळणार आहे. शालेय शिक्षण विभागाने केंद्रशाळा स्तरावर क्रीडा शिक्षक पदांना मंजुरी दिली असून, राज्यभरात एकूण ४ हजार ८६० क्रीडा शिक्षकांची पदे निर्माण करण्यात आली आहेत.

यासंदर्भातील शासन निर्णय नुकताच प्रसिद्ध करण्यात आला आहे. राज्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये सध्या शिक्षक संवर्गातील २ लाख ३६ हजार २२८ पायाभूत (प्राथमिक) पदे निश्चित आहेत.

२१ ऑगस्ट २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार समूह साधन केंद्रांची (केंद्रशाळा) पुनर्रचना करण्यात आली होती. त्यानुसार सध्या राज्यात ४,८६० समूह साधन केंद्रे कार्यरत आहेत. दरम्यान, १५ मार्च २०२४ रोजी संचमान्यतेचे निकष सुधारित करण्यात आले. या नव्या निकषांनुसार प्रत्येक केंद्रशाळेच्या स्तरावर एक क्रीडा शिक्षक पद मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे केंद्रस्तरीय विशेष शिक्षक (क्रीडा) असा स्वतंत्र संवर्ग तयार करण्यात आला असून, त्यामध्ये एकूण ४,८६० पदांचा समावेश आहे.

आतापर्यंत बहुतांश प्राथमिक शाळांमध्ये स्वतंत्र क्रीडा शिक्षक उपलब्ध नव्हते. परिणामी विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षण, व्यायाम, खेळांचे तांत्रिक मार्गदर्शन मिळण्यात अडचणी येत होत्या. मात्र, या निर्णयामुळे केंद्रशाळा स्तरावरून किमान मार्गदर्शन उपलब्ध होणार असून, शाळांमधील क्रीडा संस्कृतीला चालना मिळणार आहे. या शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदांच्या आस्थापनेवर क्रीडा शिक्षकांची नियुक्ती करण्यात येणार असून, जिल्हानिहाय पदसंख्या निश्चित करण्यात आली आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार सर्वाधिक ३६० क्रीडा शिक्षक पुणे जिल्ह्याला मिळणार आहेत.

शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे की, १८ ऑक्टोबर २०२४ च्या निर्णयानुसार केंद्रस्तरीय विशेष शिक्षक (दिव्यांग विद्यार्थी अध्यापन) या संवर्गातील पायाभूत पदांची मर्यादा कोणत्याही परिस्थितीत ओलांडता येणार नाही. ही मर्यादा लक्षात घेऊनच क्रीडा शिक्षक व विशेष शिक्षक असे दोन स्वतंत्र संवर्ग तयार करण्यात आले आहेत.

या निर्णयामुळे जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना शारीरिक तंदुरुस्ती, खेळांमधील आवड व कौशल्य विकासासाठी नवी दिशा मिळणार असून, ग्रामीण भागातील क्रीडापटूंना पुढे येण्याची संधी निर्माण होणार आहे.

## ग्राहक दिनाचे आयोजन

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

दरवर्षीप्रमाणे शासनस्तरावरून प्राप्त आदेशानुसार श्रीगोंदा तहसील कार्यालय येथे पुरवठा विभाग व अखिल भारतीय ग्राहक पंचायत, श्रीगोंदा यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि. 06 जानेवारी 2026 रोजी दुपारी 4.00 वाजता राष्ट्रीय ग्राहक दिनाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती पुरवठा निरीक्षण अधिकारी ज्ञानेश कोरे यांनी दिली.या कार्यक्रमास तहसीलदार यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध शासकीय खात्यांचे प्रमुख अधिकारी तसेच राष्ट्रीयकृत बँकांचे अधिकारी उपस्थित राहणार असून, ग्राहकांच्या विविध तक्रारी व अडचणींची थेट सोडवणूक करण्यात येणार आहे. ग्राहकांच्या खात्यांशी संबंधित अडचणी, सेवा त्रुटी अथवा अन्य तक्रारी असलेल्या नागरिकांनी आपल्या तक्रारी लेखी स्वरूपात घेऊन निर्धारित वेळेत तहसील कार्यालयात उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. हे आवाहन अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हा सहसचिव जितेंद्र पितळे, तालुकाध्यक्ष अनंता पवार, तसेच पुरवठा शाखेतील प्रज्ञा थोरात यांच्यासह उपाध्यक्ष सतीश ओहळ, शिवाजी साळुंके, नंदकुमार कुरुमकर, पीटर रणसिंग, मदन गडदे, संतोष रोडे, संतोष जठार, जयश्री औटी, शुभांगी पावसे, गणेश गडदे, किरण शिंदे, गणेश लाढाणे, अजित पटवा, दत्तात्रय जगताप, दत्तात्रय हिरडे, सुरेश पिपाडा, सुरेश दांडेकर, किशोर शिंदे व प्रमोद पवार यांनी केले आहे.

## अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या डंपरची दुचाकीला धडक

- ३२ वर्षीय तरुणाचा बळी
- बोकनकवाडी-वासुंदे रोडवर घडली घटना
- टाकळी ढोकेश्वर पोलीस स्टेशन समोर मृतदेह सह नातेवाईकांचा ठिय्या



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

मांडओहळ येथील नदीपात्रातून अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या डंपरने बोकनकवाडी ते वासुंदे रोडवर दुचाकीला जोरदार धडक दिल्याने ३२ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला. ही घटना रविवारी (दि. ४ जानेवारी) सकाळी सुमारे ७ वाजता घडली. मृत तरुणाचे नाव संतोष अहिला नऱ्हे (वय ३२, रा. बोकनकवाडी, ता. पारनेर) असे आहे.

संतोष हे बदलापूर पोलिस ठाण्यात कार्यरत महिला पोलिस कर्मचाऱ्याचे पती असून, त्यांची बहीणही पोलिस दलात सेवा बजावते. अपघातानंतर नातेवाइकांनी संतोष यांना तातडीने टाकळी ढोकेश्वर येथील खासगी रुग्णालयात दाखल केले, मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

पोलिसांच्या माहितीनुसार, संतोष हे आपल्या दुचाकीवर (क्र. एमएच १६ सीएल ६४०४) वासुंदे गावाकडे जात होते. त्यावेळी मांडओहळ नदीपात्रातून अवैध वाळू भरून आणणाऱ्या डंपरने (क्र. एमएच २२ एएन ७१७१) पाठीमागून जोरदार धडक दिली. धडकेने संतोष दुचाकीवरून खाली पडले आणि डंपरच्या मागील चाकाखाली येऊन फरफटत गेले. यात ते गंभीर जखमी झाले. घटनेनंतर डंपरचालकाने वाळू रस्त्यावरच खाली करून पसार होण्याचा प्रयत्न केला. मात्र, स्थानिकांनी व पोलिसांनी डंपर ताब्यात घेतला आहे. भाऊसाहेब रंगनाथ टोपले (वय ५०, रा. बोकनकवाडी) यांच्या फिर्यादीवरून पारनेर पोलिस ठाण्यात डंपरचालक विकास किसन शिंदे (रा. वडगाव सावताळ) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अवैध वाळू वाहतुकीमुळे असे अपघात वारंवार घडत असल्याने ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत आहे. पोलिसांनी याप्रकरणी अधिक तपास सुरू केला आहे.

### अवैध वाळू वाहतुकीवर कठोर कारवाईची गरज

मांडओहळ परिसरात सुरू असलेली अवैध वाळू वाहतूक नागरिकांच्या जीवाला धोका ठरत आहे. नियमबाह्य वाळू उत्खनन व वाहतुकीमुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून निष्पाप लोकांचे बळी जात आहेत. महसूल,पोलीस प्रशासनाने समन्वयाने कारवाई करत दोषींवर कठोर शिक्षा करणे आवश्यक आहे.

### पोलीस स्टेशन समोर नातेवाईकांचा मृतदेहासह ठिय्या

वासुंदे येथील माजी उपसरपंच महादू भालेकर यांनी तहसीलदार गायत्री सौंदाणे यांना या घटनेची माहिती देण्यासाठी फोन केला असता, त्यांनी अरेरावी केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे उत्तरीय तपासणीनंतर दुपारी ४ वाजता संतप्त नातेवाईकांनी तरुणाचा मृतदेह टाकळी पोलिस ठाण्यासमोर आणून ठेवला. आरोपी चालक-मालकाला हजर केले जात नाही, तसेच तहसीलदार याठिकाणी येत नाही, तोपर्यंत अंत्यसंस्कार करणार नसल्याचा पवित्रा नातेवाईकांनी घेतला. सपोनि नितीन खंडागळे व सपोनि दीपक सरोदे यांनी वरिष्ठांशी व नातेवाईकांशी चर्चा करीत तोडगा काढला. त्यानंतर सायंकाळी उशिरा बोकनकवाडी येथे तरुणावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# शिक्षण क्षेत्रातील जागल्या : भाऊसाहेब चासकर




**डॉ. संतोष साबळे,**
**सरचिटणीस, माजी विद्यार्थी संघ, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

**(समर्थ गांवकरी)**

**व्यवस्थेला प्रश्न विचारण्याचे धैर्य, शिक्षणाला दिशा देण्याची दृष्टी आणि शिक्षकांना आत्मभान देणारी लेखणी या सगळ्यांचा सुंदर संगम म्हणजे भाऊसाहेब चासकर! शिक्षण केवळ नोकरी नसून सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे, हे आपल्या कृतीतून त्यांनी सातत्याने दाखवून दिले. आपला निर्भीड आवाज, स्पष्ट विचार आणि विद्यार्थी, शिक्षकांसाठीची तळमळ अनेकांसाठी प्रेरणा देणारी आहे. चासकर यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने हा लेखनप्रपंच....**

शिक्षण क्षेत्रात अनेक नावे येतात-जातात; मात्र काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की त्यांची वाटचाल वैयक्तिक यशापुरती मर्यादित न राहता संपूर्ण व्यवस्थेला प्रश्न विचारणारी ठरते. भाऊसाहेब चासकर हे अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक. वर्गात मुलांमध्ये रमणारा, प्रयोगशील आणि सृजनशील शिक्षक म्हणून त्यांनी आपले अध्यापन नेहमीच जिवंत ठेवले. जिथे जिथे त्यांनी काम केले, तिथे केवळ अध्यापनच नव्हे तर शाळेच्या भौतिक विकासालाही त्यांनी दिशादर्शक स्वरूप दिले. शाळा ही केवळ इमारत नसून विचार, मूल्ये आणि संधींचे केंद्र असते, हा त्यांचा ठाम विश्वास त्यांच्या कामातून सातत्याने प्रकट होत राहिला.

शिक्षण क्षेत्रात प्रामाणिकपणे काम करणाऱ्या शिक्षकांचे कार्य समाजासमोर यावे, या उद्देशाने त्यांनी राज्यभरातील प्रयोगशील शिक्षकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच राज्यातील प्रयोगशील शिक्षकांचे एक अनौपचारिक संघटन आकाराला आले. शिक्षण संमेलन, विविध विषयांवरील प्रशिक्षण वर्ग, कार्यशाळा यांद्वारे शिक्षकांमध्ये संवादाची, आत्मचिंतनाची आणि नव्या प्रयोगांची प्रक्रिया सुरू झाली. शिक्षणविरोधी धोरणांच्या विरोधात रस्त्यावर उतरणे, वर्तमानपत्रांतून ठाम लेखन करणे, दूरदर्शनवर संयमी पण स्पष्ट मांडणी करणे, या सगळ्या भूमिकांमधून ते 'जागल्या' सारखे शिक्षण क्षेत्रात सतत बोलत राहिले.

कोणतीही कौटुंबिक किंवा राजकीय पृष्ठभूमी नसताना, केवळ कामाच्या बळावर राज्यपातळीवर स्वतःची ओळख निर्माण करणारा हा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने गठीत केलेल्या विचारगटावर सदस्य म्हणून काम करताना, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, अभ्यासक्रम समित्या अशा विविध शासकीय समित्यांवर त्यांनी आपल्या अनुभवांचे भांडार प्रभावीपणे वापरले. विविध क्षेत्रांतील विचारवंत, अभ्यासक आणि कार्यकर्त्यांशी असलेला त्यांचा संवाद त्यांच्या दृष्टीला अधिक व्यापक बनवतो.

मराठी शाळा, शासनाची शैक्षणिक धोरणे, ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थी आणि तळागाळातील शिक्षक हे भाऊसाहेब चासकर यांच्या चिंतनाचे केंद्रबिंदू राहिले आहेत. शिक्षणाला बाजारू चौकटीत अडकवण्याच्या प्रवृत्तीविरोधात उभे राहत, मराठी शाळांचे शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व त्यांनी सातत्याने अधोरेखित केले. धोरणात्मक निर्णयांपासून ते वर्गखोलीतील प्रत्यक्ष वास्तवापर्यंतचा अनुभव त्यांच्या लेखनाला धार देतो. म्हणूनच ते केवळ शिक्षक म्हणून नव्हे, तर शिक्षण क्षेत्रातील जागरूक, कृतिशील विचारवंत म्हणूनही ओळखले जातात.

भाऊ चासकर यांनी नोकरी करता करता यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे बी. ए. मराठी, समाजशास्त्र, बी. ए. जर्नालिझम आणि शालेय व्यवस्थापन पदविका हे तीन शिक्षणक्रम पूर्ण केले. या शिक्षणाचा त्यांना जीवनात मोठा उपयोग झाला. शिक्षण म्हणजे फक्त पाठ्यपुस्तकांपुरते ज्ञान नव्हे, तर जीवनाशी जोडलेली सतत चालणारी प्रक्रिया आहे, हा विचार त्यांच्या संपूर्ण कार्यातून ठळकपणे दिसतो. प्रयोगशील अध्यापन, प्रकल्प पद्धती, जीवनकौशल्यांचा विकास, पर्यावरणीय जाणीव आणि मूल्यशिक्षण यांचा समन्वय साधणारे अनेक उपक्रम त्यांनी राबवले. त्यामुळे त्यांच्या शाळा केवळ शिकवण्याच्या जागा न राहता, विचारांची प्रयोगशाळा बनल्या. 'माईंड मॅप' या उपक्रमाच्या माध्यमातून त्यांनी संकल्पनात्मक शिकण्याला नवी दिशा दिली. या उपक्रमाचे अनुकरण महाराष्ट्रासह कर्नाटक आणि गुजरातमधील शिक्षकांनीही केले. बालभारतीच्या पहिलीच्या पाठ्यपुस्तकात मुळाक्षरांपासून शब्दनिर्मितीची जी कल्पना दिसते, तीही या विचारप्रवाहाशी सुसंगत ठरते.

शिक्षकांची क्षमता बांधणी हा त्यांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. 'ॲक्टिव्ह टीचर्स फोरम' च्या माध्यमातून शिक्षकांमध्ये संवाद, सहकार्य आणि सातत्यपूर्ण अध्ययनाची संस्कृती निर्माण झाली. 'शिक्षकही सतत शिकणारा असतो' ही भूमिका त्यांनी कृतीतून अधोरेखित केली. शिक्षकांच्या पुढाकारातून राज्यात प्रथमच शिक्षण संमेलनांची एक वेगळी परंपरा सुरू होणे, हे त्यांच्या संघटन कौशल्याचे आणि दूरदृष्टीचे उदाहरण मानावे लागेल.

लेखन ही भाऊसाहेबांची केवळ अभिव्यक्ती नसून सामाजिक जबाबदारी आहे. वृत्तपत्रे, नियतकालिके, सदर लेखन, माहितीपटांचे संहितालेखन अशा विविध माध्यमांतून त्यांनी शिक्षण, पालकत्व, निसर्ग आणि समाज यांवर सातत्याने भाष्य केले. विशेषतः दुर्गम आदिवासी भागात काम करणाऱ्या प्रयोगशील शिक्षकांचे कार्य त्यांनी प्रकाशात आणले जे अन्यथा अनेकदा व्यवस्थेच्या अंधारात हरवून जाते. विविध वृत्तवाहिन्यांवर बोलताना त्यांनी नव्या शैक्षणिक प्रवाहांबरोबरच गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या आड येणाऱ्या धोरणांवरही ठाम भूमिका घेतली. त्यामुळे मराठीच नव्हे तर हिंदी आणि इंग्रजी माध्यमांतूनही त्यांचे मत विचारले जाते.

शिक्षणाबरोबरच निसर्गाशी असलेले त्यांचे नातेही तितकेच जिवंत आहे. हौशी निसर्ग छायाचित्रकार म्हणून त्यांनी सह्याद्रीतील जैवविविधता, रानफुले, काजवे आणि जलोत्सवांचे संवेदनशील दस्तऐवजीकरण केले. कळसुबाई–हरिश्चंद्रगड अभयारण्यात त्यांनी तब्बल ५२८ रानफुलांची छायाचित्रे टिपली. अकरा वर्षे मन, देह आणि काम यांची एकरूपता साधत केलेले हे कार्य त्यांच्या निसर्गदृष्टीची साक्ष देते. बहिरवाडी येथील शाळेत कार्यरत असताना त्यांच्या पुढाकारातून बहिरोबाची उघडी, बोडकी टेकडी आज हिरवीगार बनली आहे. शिक्षण आणि निसर्ग—हे दोन्ही माणसाला समृद्ध करणारे घटक आहेत, ही जाणीव त्यांच्या कामातून सातत्याने अधोरेखित होते.

भाऊसाहेब चासकर यांची वाटचाल 'पाठबळ मिळालं म्हणून पुढे आलो' अशी नाही; तर 'काम बोलतं' याची तंतोतंत साक्ष देणारी आहे. ठराविक चौकटीत न अडकता, प्रश्न विचारत, प्रयोग करत आणि लिहित राहणारी ही अखंड वाटचाल आजच्या शिक्षण व्यवस्थेला आरसा दाखवणारी आहे. म्हणूनच ते केवळ शिक्षक नाहीत, तर मराठी शाळांसाठी झटणारे, विचारांना दिशा देणारे आणि शिक्षण क्षेत्रातील एक महत्त्वाचे जागते व्यक्तिमत्त्व आहेत. वर्गखोलीपासून धोरणनिर्मितीपर्यंत शिक्षणाला केंद्रस्थानी ठेवत प्रश्न विचारणारी आणि प्रयोगशीलतेने रस्ता दाखवणारी चासकर यांची वाटचाल आहे.

हिंदीतील प्रसिद्ध कवी दुष्यंत कुमार यांच्या शब्दांत सांगायचं झालं, तर—

"सिर्फ हंगामा खड़ा करना
मेरा मकसद नहीं, मेरी कोशिश है
कि ये सूरत बदलनी चाहिये।"

हीच भूमिका भाऊसाहेब चासकर यांच्या संपूर्ण वाटचालीत सातत्याने दिसून येते. केवळ आवाज उठवणं किंवा विरोधासाठी विरोध करणं हा त्यांचा उद्देश कधीच राहिलेला नाही; तर शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी ओळखून त्या बदलण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणं, हीच त्यांची खरी भूमिका आहे.

मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळालंच पाहिजे, या ठाम भूमिकेतून शिक्षणविरोधी धोरणांना विरोध करणारा हा ध्येयवादी शिक्षक केवळ वर्गखोलीपुरता मर्यादित राहिलेला नाही. लेखन, सामाजिक हस्तक्षेप आणि वैचारिक मांडणीच्या माध्यमातून त्यांनी शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न केला आहे.

त्यांचा हा प्रवास संघर्षमय असला, तरी तो तितकाच स्पष्ट, प्रामाणिक आणि मूल्याधिष्ठित आहे. म्हणूनच भाऊसाहेब चासकर यांची आजवरची वाटचाल केवळ वैयक्तिक यशाची कहाणी न राहता, शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या अनेकांसाठी प्रेरणादायी ठरते.

# अहिल्यानगर महापालिका निवडणुकीतील पाच बिनविरोध नगरसेवकांची माहिती निवडणूक आयोगाला सादर



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर येथील महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत पाच नगरसेवक बिनविरोध निवडून आले असून त्यांच्या निवडीची केवळ औपचारिक घोषणा बाकी आहे.

मात्र, राज्यभरात नगरसेवकांच्या बिनविरोध निवडीवरून आरोप-प्रत्यारोप सुरू झाल्याच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने संबंधित महापालिकांकडून सविस्तर माहिती मागविली होती. त्यानुसार अहिल्यानगर महापालिकेच्या मुख्य निवडणूक निर्णय अधिकार्‍यांनी संपूर्ण माहिती राज्य निवडणूक आयोगाकडे सादर केल्याचे आयुक्त तथा मुख्य निवडणूक अधिकारी महापालिका यशवंत डांगे यांनी सांगितले.

अहिल्यानगर महापालिकेचे पाच जागांवर उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. या बिनविरोध नगरसेवकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे कुमार वाकळे व प्रकाश भागानगरे, भाजपच्या पुष्पा बोरूडे, सोनाबाई शिंदे व करण कराळे यांचा समावेश आहे.

या सर्वांच्या निवडीची अधिकृत घोषणा लवकरच करण्यात येणार आहे. बिनविरोध निवडीनंतर आता महापालिकेच्या उर्वरित ६३ जागांसाठी २८३ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. निवडणूक अर्जांच्या छाननीदरम्यान शिवसेना (शिंदे गट) च्या पाच उमेदवारांचे अर्ज बाद ठरले होते. त्यानंतर अर्ज माघारीच्या प्रक्रियेत शिवसेना तसेच महाविकास आघाडीच्या काही उमेदवारांनी माघार घेतल्याने काही प्रभागांमध्ये बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला.

अहिल्यानगर प्रमाणेच राज्यातील अनेक महापालिकांमध्ये बिनविरोध निवडींचे प्रमाण वाढल्याने त्यावरून राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने सर्व महापालिकांच्या मुख्य निवडणूक निर्णय अधिकार्यांकडून बिनविरोध निवड झालेल्या उमेदवारांची सविस्तर माहिती मागविली होती. त्यानुसार अहिल्यानगर महापालिकेच्या निवडणूक निर्णय अधिकार्यांनी आवश्यक ती माहिती आयोगाकडे सादर केली असून पुढील कार्यवाही आयोगाच्या पातळीवर होणार आहे.

# कुंटुर पोलीसांनी बळेगाव येथील दारू विक्रेत्यांनच्या घरावर धाड टाकून अवैध दारू जप्त

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील कुंटूर सर्कल अंतर्गत असलेल्या पोलीस स्टेशन अवैध दारू विक्रेत्यावर कुंटूर पोलिसांनी धाड टाकून ९२ दारूच्या बाटल्या व बियरचे काही बॉक्स जप्त केले असून त्यात २२ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. एक आरोपीवर गुन्हा दाखल करून ताब्यात घेतले आहे. अशी माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल भोसले यांनी दिली आहे.

गुप्त माहिती आधारे बळेगाव येथील गावांमध्ये नागेश दत्ता बेलकर यांच्या घरामध्ये दारूचे देशी दारूचे अवैध बॉक्स व बियर चे बॉक्स ठेवण्यात आले असल्याची अशी माहिती कुंटूर पोलिसांना मिळाली व त्या माहिती च्या आधारे सहायक पोलीस निरीक्षक विशाल भोसले यांच्या टीमने ही कामगिरी केली.यात




पोलीस उप निरीक्षक मल्लिकार्जुन कोरामुंगे , बीट प्रमुख पवार, स्वामी ,महिला कर्मचारी सुनीता अलमोड,यांनी मिळून बळेगाव येथील बेलकर यांच्या घरावर धाड टाकून सदर देशी व विदेशी दारूचा साठा जप्त केला.

सदर मालाची किंमत २२ हजार रुपयांच्या वर असल्याची माहिती पोलीस प्रशासनाने दिले आहे. कुंटूर पोलिसांच्या या कामगिरीमुळे परिसरातील अवैध वाल्यांचे चांगलेच धाबे दणाणले असल्याचे दिसत आहे.व सर्वसामान्य गावातील नागरिक समाधान व्यक्त करत पोलिसांच्या या कामगिरीचे कौतुक करत असल्याचे दिसत आहे.

# अकोले शाळेच्या विद्यार्थिनीचे सुयश

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत जि. प. प्राथमिक शाळा अकोले येथील दोन विद्यार्थिनींनी प्रथम क्रमांक पटकावला. केंद्र पातळीवरील क्रीडा स्पर्धेत शाळेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे. अकोले तालुक्यात दिनांक २ जानेवारी २०१६ रोजी जिल्हा परिषद अहिल्यानगर व पंचायत समिती अकोले, शिक्षण विभाग यांच्या वतीने तालुकास्तरीय सांस्कृतिक कार्यक्रम व विविध गुणदर्शन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये विविध गुणदर्शन अंतर्गत एकूण सात प्रकारच्या स्पर्धा घेण्यात आल्या. या अंतर्गत झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत जि. प. प्राथमिक शाळा अकोलेच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले. किलबिल गटात (इ. १ ली) कु. आरोही प्रशांत नाईकवाडी हिने प्रथम क्रमांक पटकाविला, तर





बालगटात (इ. ४ थी) कु. दिव्या प्रकाश साळवे हिने प्रथम क्रमांक मिळवून शाळेचा नावलौकिक वाढविला. कु. आरोही नाईकवाडी हिला वर्गशिक्षिका श्रीमती अस्मिता डमाळे मॅडम, तर कु. दिव्या साळवे हिला वर्गशिक्षिका श्रीमती आशा खैरे मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या यशामुळे दोन्ही विद्यार्थिनींना जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत अकोले तालुक्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे.मधल्या काळात शाळेची पडझड झाली होती. त्यावर मात करत उपक्रमशील शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली अकोले येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थिनींनी मिळवलेले यश विशेष उल्लेखनीय आहे. मेहनती आणि कल्पक शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली गुणवत्ता पूर्ण शिक्षण आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी शाळेत विविध प्रकारचे उपक्रम राबवले जात असल्याने शाळेची पटसंख्या झपाट्याने वाढत आहे.

# ‘आपले सरकार पोर्टल’वरील २ हजार ८४० तक्रारी निकाली

**जिल्हा परिषद, ठाणे : (समर्थ गांवकरी)**

राज्य सरकारने सुरु केलेल्या आपले सरकार २.० वरील तक्रारी निकाली काढण्यासाठी जिल्हा परिषद, ठाणे सामान्य प्रशासन विभागाकडून विशेष मोहीम राबवण्यात आली आहे. जिल्हा परिषदेस आपले सरकार पोर्टलवर २ हजार ८९५ तक्रारी प्राप्त झाल्या असून २ हजार ८४० तक्रारी निकाली काढल्या आहे तर फक्त ३८ तक्रारी पुढील कार्यवाहीसाठी क्षेत्रीय स्तरावर विस्तृत अहवाल मागणीसाठी प्रलंबित आहेत. या पोर्टलद्वारे ग्रामस्थांना आपल्या तक्रारी ऑनलाइन दाखल करणे तसेच त्याची सद्यस्थिती जाणून घेण्याची सुविधा उपलब्ध असून ९८ टक्के तक्रारी निकाली काढण्यात यश मिळवले आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यात कृषी निविष्ठा विक्रीमध्ये अनियमितता

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यात रब्बी हंगामात शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण कृषी निविष्ठांचा योग्य दरात पुरवठा व्हावा, यासाठी कृषी विभागाच्या वतीने प्रयत्न करण्यात येत आहे.

कृषी विभागाच्या वतीने करण्यात आलेल्या तपासणीत निविष्ठा विक्रीत अनियमितता आणि लिंकींग करणाऱ्या पाथर्डीतील ३ व कोपरगावमधील ८ अशा ११ ठिकाणी कृषी विभागाने परवाने निलंबित केले आहेत.

रब्बी हंगाम २०२५-२६ मध्ये शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण कृषी निविष्ठांचा योग्य दरामध्ये पुरवठा होण्याच्यादृष्टीने जिल्ह्यात तालुकास्तरीय गुणनियंत्रण निरीक्षक आणि भरारी पथक यांच्यामार्फत तपासणी मोहिम हाती घेण्यात आलेली आहे.

या तपासणी अंती निविष्ठा विक्री केंद्रामध्ये त्रुटी, तसेच



नियमबाह्य गोष्टी आढळल्यास कडक कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी दिलेले आहेत. त्यासोबतच पुर्ण तपासणी करुन विविध निविष्ठांचे नमुने काढणे, खत विक्री व्यवहार नोंदी, ज्यादा दराने खते विक्री, खतांची लिंकिंग असे प्रकार आढळल्यास संबंधितांवर कृषि निविष्ठा विक्री कायदे व नियम नुसार कारवाई करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.

युरीया खताची वाढती मागणी व युरिया विक्रीमध्ये होत असलेल्या गैरप्रकाराच्या तक्रारी कृषि विभागास प्राप्त झालेल्या होत्या. त्या रोखण्यासाठी तसेच ई-पॉसवरील खत साठा व गोदामातील प्रत्यक्ष साठा या तफावत आढळून येत होती. त्यासाठी कृषि विभागाने जिल्हाभरात कृषि सेवा केंद्रांची तपासणी मोहिम व्यापक स्वरुपात राबविण्यात आली.

जिल्हाभरात झालेल्या तपासणी मध्ये कृषि निविष्ठा कायदा, अत्यावश्यक अधिनियम तसेच परवाने अटी व नियमानुसार त्रुटी आढळलेल्या पाथर्डी ३, कोपरगाव ८ असे जिल्ह्यातील कृषि सेवा केंद्राच्या ११ परवान्यांवर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयात संबंधितांची सुनावणी घेऊन त्यांचे परवाने निलंबित करण्याचे आदेश बजावले आहेत.

> जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना युरिया व इतर खतांसोबत लिकिंग अथवा कृषि निविष्ठांच्या गुणवत्तेबाबत तक्रारी असल्यास नजीकच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालय किंवा कृषि विभागाच्या टोल फ्री क्रमांक 18002334000 वर, तसेच 9822446655 यानंबर वर तक्रार नोंदवावी.
> **– सुधाकर बोराळे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी**

तसेच जिल्ह्यातील सर्व कृषि सेवा केंद्र यांना कृषि निविष्ठा कायद्यांतर्गत असलेले नियम व अटी पाळुन शेतकऱ्यांना त्रास होणार नाही, अशा पध्दतीने कृषि निविष्ठा पुरवठा करावा, असे आवाहन सुधाकर बोराळे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी केलेले आहे.

# क्रांतिज्योती सावित्रीबाईंचे कार्य आजही समाजाला प्रेरणादायी – अ‍ॅड. यशवंत पोटे



**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

समाजातील स्त्री-पुरुष विषमतेची दरी आजही पूर्णपणे कमी झालेली नाही. ही दरी कमी करण्यासाठी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी केलेले कार्य आजही समाजाला प्रेरणा देणारे आहे, असे प्रतिपादन अ‍ॅड. यशवंत पोटे यांनी केले.

लोखंडेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी नूतन नगरसेवक राजेंद्र खेडकर, ऋषिकेश बोरुडे, पल्लवी पोटे व कोमल बोरुडे यांचा शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात ग्रामस्थ संतोष लोखंडे यांनी मनोगत व्यक्त करत शाळेतील वर्गखोलीचा प्रश्न, पिण्याच्या पाण्याची सुविधा तसेच इतर मूलभूत समस्या उपस्थित केल्या. यावर नगरसेवक राजेंद्र खेडकर, पल्लवी पोटे, कोमल बोरुडे, ऋषिकेश बोरुडे व पांडुरंग पोटे यांनी नगरपालिका स्तरावरून शक्य तेवढे सर्वतोपरी सहकार्य करून शाळेच्या समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले. यावेळी राजेंद्र खेडकर यांनी शाळेची गरज ओळखून सुमारे आठ हजार रुपये किमतीचे एक ऑफिस कपाट तातडीने देण्याची घोषणा केली. कार्यक्रमास दत्तात्रय सुद्रिक, सोमनाथ शिर्के, सुदाम घोरपडे, कैलास लोखंडे, अण्णासाहेब पोटे, बाळासाहेब लोखंडे, संतोष मोटे, परशुराम शिर्के, सोमनाथ लोखंडे, बाळासाहेब मोटे, विलास लोखंडे, दादासाहेब कुसकर, जयसिंग सुद्रिक, सहशिक्षिका मंगल जाचक यांच्यासह पालक व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक डॉ. संदीप मोटे यांनी केले, तर आभार संतोष लोखंडे यांनी मानले.

> बाबासाहेब किसन लोखंडे यांनी शाळेसाठी स्वतःची तीन गुंठे जागा बक्षीसपत्राद्वारे देण्याची घोषणा केली. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला शाळेच्या जागेचा प्रश्न मार्गी लागणार आहे. या उल्लेखनीय योगदानाबद्दल ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने बाबासाहेब लोखंडे यांचा सत्कार करण्यात आला.

# आनंददायी निवृत्ती वेतन योजनेंतर्गत सेवानिवृत्त १७१ अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद ठाणेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या आनंददायी निवृत्ती वेतन योजना अंतर्गत एप्रिल ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान सोहळा आज, सोमवार दि. ०५ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद ठाणे येथील बी. जे. हायस्कूलच्या सभागृहात उत्साहात पार पडला.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार होते. यावेळी अध्यक्षीय भाषणात त्यांनी सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील आयुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात तब्बल ३० ते ३५ वर्षांहून अधिक काळ प्रामाणिकपणे सेवा बजावणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या विकासात मोलाचा वाटा उचलला असल्याचे त्यांनी नमूद केले. निवृत्तीनंतर आरोग्याची काळजी घेणे, छंद जोपासणे, सामाजिक व विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन आयुष्याची नवी सकारात्मक सुरुवात करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे यांनी सांगितले की, ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात काम करताना सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या कामकाजात अमूल्य योगदान दिले आहे. प्रदीर्घ सेवा बजावलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा सन्मान करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवावृत्तीचे लाभ वेळेत मिळावेत, यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव सातत्याने आढावा बैठका घेऊन विविध समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यशवंतराव चव्हाण पंचायतराज अभियान तसेच १०० दिवस कृती कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषदेला मिळालेले यश हे सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित असल्याचे त्यांनी नमूद केले.

या सन्मान सोहळ्यात शिक्षणाधिकारी (माध्यमिक) देविदास महाजन, जिल्हा कृषी अधिकारी मुनीर बाचोटीकर, कृषी अधिकारी अण्णासाहेब घागरे, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) संदिप पाटील, भाऊराव मोहिते, कनिष्ठ प्रशासन अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग) मनोज देवकर तसेच जिल्हा परिषदेचे विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार यांच्या शुभहस्ते एकूण १७१ सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी सेवानिवृत्त विस्तार अधिकारी (शिक्षण) संजय थोरात यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, ३५ वर्षांच्या सेवाकाळात अनेक अनुभव आले. शिक्षण विभागातील विविध उपक्रम राबविताना सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दिलेले सहकार्य अमूल्य असून जिल्हा परिषदेत काम करण्याचा आनंद आणि समाधान लाभल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

लघुटंकलेखक (उच्चश्रेणी), सहाय्यक प्रशासन अधिकारी, विस्तार अधिकारी (शिक्षण), मुख्याध्यापक, ग्रामविकास अधिकारी, प्राथमिक शिक्षक, केंद्रप्रमुख, पदवीधर शिक्षक, आरोग्य सेविका (महिला), आरोग्य सहाय्यक (पुरुष), स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, कनिष्ठ अभियंता, कनिष्ठ सहाय्यक, वरिष्ठ सहाय्यक, पर्यवेक्षिका, औषध निर्माण अधिकारी, शिपाई, वाहन चालक व मैल कामगार आदी विविध पदांवरील अधिकारी-कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.



प्रभाग क्रमांक ११ मध्ये (उद्धव बाळासाहेब ठाकरे)

# शिवसेना गटाचे अधिकृत उमेदवारांचा प्रचाराचा शुभारंभ

**मोठे शक्ती प्रदर्शन : प्रभाग ११ मधील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

प्रभाग क्रमांक ११ मधील (उद्धव बाळासाहेब ठाकरे) शिवसेना गटाचे उमेदवार अधिकृत उमेदवार विशाल वालकर, सौ.ताराबाई गणेश शिंदे, विमलताई शिवाजी सुसरे यांच्या प्रचाराचा शुभारंभ दिल्लीगेट येथील शमी गणपती मंदिर येथे पूजन करून करण्यात आला.याप्रसंगी प्रभागातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते नारळ वाढविण्यात आले.तसेच चौपाटी कारंजा येथील दत्त मंदिर, भैरवनाथ मंदिर येथे दर्शन घेऊन,स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्याचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यानंतर प्रभागातून नालेगाव कुंभार गल्ली,चौपाटी कारंजा, चितळे रोड,छाया टॉकीज चौक,नेता सुभाष चौक,कापड बाजार,नवी पेठ या भागात प्रचार फेरी काढण्यात आली.यावेळी प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रचाराच्या शुभारंभ प्रसंगी बोलताना विशाल वालकर म्हणाले, माजी मंत्री स्वर्गीय अनिल भैय्या राठोड यांच्या विचारांचा वारसा घेऊन ,(उद्धव बाळासाहेब ठाकरे)शिवसेना गटाचे अधिकृत उमेदवार निवडणूक लढवीत आहेत. जनतेची सेवा करण्याची संधी शिवसेनेच्या उमेदवाराला द्यावी.

सौ.ताराबाई शिंदे म्हणाल्या, प्रभाग विकास हेच आमचे ध्येय असून नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी शिवसेना नेहमीच प्रयत्नशील असते. प्रभागातील नागरिकांच्या समस्या सोडविण्या सोबतच महिलांचे प्रश्न सोडवणे हे आमचे उद्दिष्ट आहे.

गणेश शिंदे म्हणाले, प्रभागातील नागरी समस्या सोडवण्यासाठी शिवसेना महाविकास आघाडीचा पॅनल दिवस- रात्र झटणार आहे.उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या अधिकृत उमेदवारांना जनतेने मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे. प्रभागाच्या विकासासाठी हे पॅनल सदैव कटिबद्ध राहील.

अँड.आशिष सुसरे म्हणाले, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाचे अधिकृत उमेदवारांचा पॅनलचा प्रचाराचा शुभारंभ आज करण्यात आला आहे.तीनही उमेदवारांना प्रभागातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. प्रभागातील समस्या सोडविणे तसेच जनतेचे प्रश्न सोडविणे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून निवडणूकीला सामोरे जात आहोत.

# दोन्ही राष्ट्रवादी एकत्र ! खासदार निलेश लंके यांचं मोठं वक्तव्य...

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट पुन्हा एकत्र आल्यास उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह ज्येष्ठ नेते शरद पवार यांनाही समाधान वाटेल, असे मोठे वक्तव्य खासदार निलेश लंके यांनी केले आहे.

सध्याच्या राजकीय घडामोडींवर प्रतिक्रिया देताना त्यांनी ही भूमिका मांडली. ते पिंपरी- चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

राष्ट्रवादी काँग्रेस हा केवळ राजकीय पक्ष नसून तो शरद पवारांचा परिवार असल्याचे सांगत, राजकीय कालखंडात हा परिवार जर एकसंघ राहिला तर त्याचा आनंदच होईल, असे लंके म्हणाले. राष्ट्रवादीत दोन गट पडले असले तरी सुख-दु:खात हे सर्व नेते आणि कार्यकर्ते एकत्र राहिले असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

पुणे आणि पिंपरी - चिंचवडचा विकास हा शरद पवार यांच्या नेतृत्वामुळे झाला असून अजित पवारांनीही त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत विकासाची कामे केली असल्याचे मत खासदार लंके यांनी व्यक्त केले. त्यामुळे भविष्यात दोन्ही राष्ट्रवादी पुन्हा एकत्र आल्यास हा निर्णय सर्वसामान्य नागरिकही स्वीकारतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राजकारण हे क्षणाक्षणाला बदलत असते. त्यामुळे कोणतेही ठाम भाकीत करता येत नाही. वाट पाहू आणि बघू, अशी प्रतिक्रिया देत लंके यांनी पुढील काळात राजकीय समीकरणे बदलू शकतात, असे संकेत दिले.

# आजपासून बडी दर्याचा उर्स; कंधार येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतीक असलेले प्रसिद्ध सुफीसंत हजरत हाजी सय्याह सरवरे मगदुम सय्यद सईदीद्दीन रफाई (रहे.) यांच्या ७११ व्या उर्साला येत्या मंगळवारी, दि.६ जानेवारीपासून सुरुवात होणार आहे. चार दिवस चालणाऱ्या उर्सामध्ये संदल मिरवणूक, कुस्त्यांची दंगल, कव्वालीचा मुकाबला, हास्यकवी संमेलनासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



सोमवारी, दि.५ जानेवारी रोजी गुसल शरीफ चा कार्यक्रम होणार आहे. मंगळवारी, दि.६ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता नमाज नंतर बडी दर्यातून संदल मिरवणूक काढण्यात येणार आहे. बुधवारी, ७ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता कुस्त्यांची दंगल होणार आहे. संध्याकाळी ८ वाजता टी.व्ही. सिंगर बेबी जारा वारसी (दिल्ली)) व टी.व्ही. सिंगर साखीब आली साबरी (उत्तरप्रदेश) यांचा कव्वालीचा कार्यक्रम पार पडणार आहे. तसेच मंगळवारी, दि. ६ जानेवारी व बुधवारी, दि.७ जानेवारी रोजी

लंगरचा कार्यक्रम होणार आहे. गुरुवारी, दि.८ जानेवारी रोजी सायंकाळी ८ वाजता कुलहिंद मजाहीया मुशायरा (हास्यकवी संमेलन) आयोजित करण्यात आला आहे. या कवी संमेलनात नामांकित कवी सहभागी होणार आहेत.

उर्सानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांचा सर्व भाविकांनी लाभघ्यावा, असे आवाहन बडी दर्याचे सज्जादा नशीन सय्यद शहा मुर्तुजा मोहियोद्दीन हुसेनी रफाई, बडी दर्गाचे मुतवल्ली सय्यद शहा मुजतबा मोहियोद्दीन हुसेनी रफाई, बडी दर्गा उर्स कमिटीचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष मोहम्मद जफरोदिन बाहोदिन यांनी केले आहे.

# कॉपीमुक्त व भयमुक्त वातावरणात परिक्षा

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील बरबडा येथील बरबडा सर्कल अंतर्गत असलेल्या जवाहरलाल नेहरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बरबडा दि . 5 जानेवारी रोजी सकाळी ठीक 11:00 वाजता पालक व शिक्षक सहविचार सभा आयोजीत करण्यात आलेली होती .महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ, लातूर यांच्या मार्गदर्शनानुसार 10 फेब्रु 2026 रोजी सुरु होणाऱ्या परिक्षेसाठी कॉपीमुक्त व भयमुक्त वातावरणात परिक्षा घेण्यासाठी पालकामार्फत, समाज व विद्यार्थी जन जागृती निर्माण करण्यासाठी घेतलेल्या सहविचार सभेस बहुसंख्य पालक उपस्थित होते. संस्थेचे सहसचिव तथा प्राचार्य सुदर्शनराव धर्माधिकारी यांनी पालकांना परिक्षेच्या संदर्भात सखोल असे मार्गदर्शन केले.

# कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची राज्यस्तरावर दखल

- **बंडू पाचपुते व गणेश जठार यांचा मा.आ.भीमराव धोंडे यांच्या हस्ते सन्मान**

**कर्जत : (समर्थ गांवकरी)**

कृषी क्षेत्रात सर्वसामान्य शेतकरी केंद्रस्थानी ठेवून सातत्याने नाविन्यपूर्ण व प्रेरणादायी उपक्रम राबविणाऱ्या काष्टी येथील बंडु वामनराव पाचपुते व गणेश विठ्ठलराव जठार यांच्या कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची राज्यस्तरावर गौरवपूर्ण दखल घेत राज्यस्तरीय गंगाजी–बाबाजी आदर्श पुरस्कार २०२५–२०२६ प्रदान करण्यात आला.



दि. १ जानेवारी रोजी हा पुरस्कार प्रदान होणार होता. मात्र तांत्रिक कारणांमुळे या पुरस्कार सोहळ्याला उपस्थित राहता न आल्याने सोमवार दि.५ जानेवारी रोजी शिक्षणमहर्षी मा.आ.भीमरावजी धोंडे यांच्या शुभहस्ते कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल बंडु पाचपुते व गणेश जठार यांचा सन्मानपूर्वक सत्कार करून पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सर्वसामान्य शेतकरी वर्गाला स्थानिक पातळीवरच आधुनिक शेती, नव्या तंत्रज्ञानाची माहिती, कृषी अवजारे, बियाणे, खत व्यवस्थापन व कृषीपूरक व्यवसायांची माहिती मिळावी या एकमेव उद्देशाने सन २०१५ साली काष्टी तालुका श्रीगोंदा येथे ग्रामीण कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या पहिल्याच कृषी प्रदर्शनाला शेतकरी वर्गाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या यशस्वी उपक्रमातून प्रेरणा घेत आजूबाजूच्या तालुक्यांमध्येही कृषी प्रदर्शनांचे आयोजन सुरू झाले. मागील ११ वर्षांपासून महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये सातत्याने यशस्वी कृषी प्रदर्शनांचे आयोजन करून त्यांनी शेतकरी वर्गासाठी एक आगळा वेगळा आणि उपयुक्त उपक्रम राबविला आहे.

या कालावधीत त्यांच्या कार्याची दखल घेत पद्मभूषण अण्णा हजारे, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील, माजी मंत्री बबनराव पाचपुते, खासदार निलेश लंके, मा.खासदार प्रितमताई मुंडे, माजी आमदार स्व.अरुणकाका जगताप, आमदार अशोक बापू पवार यांच्यासह अनेक मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला आहे.

# जण माहिती अधिकाराची पायमल्ली करणाऱ्या अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्याची मागणी

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

बिलोली येथील स्वस्त धान्ये पुरवठा विभागात जण माहिती अधिकार कायदा २००५ अंतर्गत जनहितार्थ मागविण्यात आलेल्या माहिती संदर्भात पुरवठा विभागाचे जण माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी ३९६ रुपये फीस आकारून देखील माहिती दिली नाही. यामुळे कायद्याचे उल्लंघन केले आहे. म्हणून संबंधित अधिकारी / कर्मचारी यांची रितसर चौकशी करून कार्यवाही करावी अशा मागणीचे निवेदन प्रसाद कुलकर्णी यांनी बिलोलीचे तहसीलदार गजानन शिंदे यांच्याकडे केली आहे.

भारतीय नागरिकांना शासकीय कार्यालयांमधील माहिती मिळवण्याचा अधिकार देणारा, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवणारा एक महत्त्वाचा कायदा आहे, जो लोकशाहीला मजबूत करतो आणि भ्रष्टाचाराला आळा घालतो; या कायद्यामुळे नागरिक सरकारी कामकाज, योजना आणि प्रक्रियांची माहिती मिळविण्यासाठी नागरिक अर्ज करून माहिती मागू शकतात आणि ती ठराविक वेळेत देणे बंधनकारक आहे. अशी माहिती न मिळाल्यास किंवा चुकीची माहिती दिल्यास अपील करण्याची तरतूद आहे. अपील प्रक्रियेतही माहिती देण्यास किंवा हेतुपुरस्सर नाकारल्यास जन माहिती अधिकाऱ्यावर दंड आकारला जाऊ शकतो असा कायदा लागू करण्यात आला आहे. विशेषतः शासकीय,निमशासकीय अशा विविध कार्यालतील जनहितार्थ सार्वजनिक योजना अथवा व्यक्तीगत कामास संबंधित कार्यालयातून विलंब करणे,किंवा शासनाच्या योजनेत भ्रष्टाचार करून शासनाची फसवणूक करणे व सत्य माहिती दडून ठेवणे याबाबतची माहिती बाहेर आणण्यासाठी जण माहिती अधिकार कायदा हा १२ ऑक्टोबर २००५ रोजी लागू झाला असून यात केंद्रीय माहिती आयोग (सीआयसी ) आणि राज्य माहिती आयोग (एसआयसी ) यांची स्थापना केली गेली आहे. या कायद्याच्या धास्तीने काही प्रमाणात भ्रष्टाचारावर आळा बसला आणि अन्याय होणाऱ्या ठिकाणी न्यायही मिळाले आहे. यानुसार या कायद्या अंतर्गत प्रसाद कुलकर्णी यांनी बिलोली स्वस्त धान्य पुरवठा विभागातील काही कामा संदर्भात माहिती मागवण्यासाठी दि.०७ नोव्हेंबर २०२५ रोजी माहितीचा अर्ज केला त्यानुसार जण माहिती अधिकारी यांनी १२ डिसेंबर २०२५ रोजी कुलकर्णी यांना संबंधित माहिती संदर्भातील दस्तावेद देण्यासाठी चालनाद्वारे फी भरण्याचे कळविले त्यानुसार प्रसाद कुलकर्णी यांनी ३९६ इतकी फी भरून चालान तहसील कार्यालय, बिलोली येथील पुरवठा शाखेत सादर केले पण ती माहिती आद्यप देण्यात आली नाही. म्हणून माहिती अधिकार कायदा २००५ च्या कलम ७ (६) नुसार, जर माहिती ३० दिवसाच्या आत दिली नसेल तर ती माहिती अर्जदारास मोफत देणे बंधनकारक आहे व कोणतीही फी आकारता येत नाही. असे असताना सुद्धा कायद्याचे उल्लंघन करून फी आकारण्यात आली. याबाबत कुलकर्णी यांनी संबंधित जण माहिती अधिकाऱ्याची चौकशी करून कार्यवाही करण्याची निवेदना द्वारे मागणी बिलोली तहसीलदार यांच्याकडे केली आहे.

# महात्मा फुले, सावित्रीबाई यांना मानवंदना

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुक्यातील पश्चिम आदिवासी भागातील आदिवासी पेसा ग्रामपंचायत अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खटकाळे येथे आद्य शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती, तसेच 'बालिका दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.यावेळी शाळेतील विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले, महात्मा ज्योतिबा फुले यांची वेशभूषा परिधान करून स्त्री शिक्षणाचा जागर करत विद्यार्थ्यांनी सावित्रीबाईंच्या कार्याला उजाळा दिला. आर्यन गागरे या विद्यार्थ्याने महात्मा ज्योतिराव फुले व तेजस्विनी गागरे या विद्यार्थिनीने सावित्रीबाई फुले यांची यांची वेशभुषा केली होती.

# अभाविपच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांत अधिवेशन छात्र कुंभ मैदान नाशिक येथे संपन्न

- **पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्षपदी प्रा.प्रदिप वाघ तर प्रांत सहमंत्री म्हणून मेघा शिरगावे यांची निवड..!**

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**



अखिल भारतीय विद्यार्थी परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्या अधिवेशनाचा सोमवारी समारोप झाला. ०२ ते ०५ जानेवारी दरम्यान नाशिक येथे पार पडलेल्या या अधिवेशनात विविध सत्रे प्रास्ताविके, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच शैक्षणिक सामाजिक सांस्कृतिक, कुंभमेळा असे ४ प्रस्ताव पारित करण्यात आले.

सकाळी "स्वबोध" या विषयावर रा. स्व. संघाचे जेष्ठ प्रचारक श्री. सुमंत आमशेकर यांनी मार्गदर्शन केले. भारत हा युग परिवर्तन करण्याची क्षमता असणाऱ्या युवकांचा देश आहे. भारताची संस्कृती ही माता भूमि: पुत्रो अहं पृथिव्या: अशी पर्यावरण पूरक राहिली असून भारत हा युग परिवर्तन करण्याची क्षमता असणाऱ्या युवकांचा देश आहे असे आमशेकर यांनी यावेळी सांगितले.

पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्या अधिवेशनाच्या शेवटी पश्चिम महाराष्ट्र प्रांत कार्यकारणीची घोषणा करण्यात आली. या कार्यकरणीवर नाशिकचा वरचष्मा पाहायला मिळाला. पश्चिम महाराष्ट्र उपअध्यक्ष म्हणून प्रा. प्रदिप वाघ, सहमंत्री म्हणून मेघा शिरगावे, आयटी आय प्रमूख प्राचार्य वैभव गुंजाळ, राष्ट्रीय कलामंच प्रमूखपदी पियुषा हिंगमीरे या कार्यकर्त्यांची निवड करण्यात आली.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी



**टाकळी ढोकेश्वर: (समर्थ गांवकरी)**

टाकळी ढोकेश्वर येथील, श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात, 3 जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी गावातील प्रतिष्ठित महिला डॉक्टरांना निमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. सौ. गायखे मॅडम होत्या. तर प्रमुख पाहुणे डॉ. सौ. पुरी मॅडम, डॉ. सौ. ऋत्विज खिलारी मॅडम, डॉ. सौ. निमसे मॅडम, विद्यालयाच्या विद्यार्थी सुरक्षा समितीच्या अध्यक्षा, सौ.अर्चना रांधवन मॅडम उपस्थित होत्या. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांसह, विद्यालयाचे प्राचार्य श्री. बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षिका श्रीम. मनीषा गाडगे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केले. डॉ. सौ. पुरी मॅडम, डॉ. सौ. ऋत्विज खिलारी मॅडम, डॉ. सौ. निमसे मॅडम, डॉ. गायखे मॅडम, यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्याविषयी व विद्यार्थ्यांच्या दैनंदिन आरोग्याविषयी अतिशय अनमोल मार्गदर्शन केले.

# हनुमानचे चरित्र अद्भुत, अनाकलनीय, हनुमानाचे समर्पण, सेवा, भक्ती या गुणांचा अंगीकार करावा

**गौडीया वैष्णवाचार्य श्री युगलशरणजी महाराज यांचे प्रतिपादन : वैष्णवी भजनी मंडळाच्या आयोजीत श्री हनुमान कथे ( चरीत्र)स सुरुवात**

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

वैष्णवी भजनी मंडळ हे सुंदर कांड म्हणत हनुमानाची नित्यसेवा करत आहेत. एकत्रित जमा होणाऱ्या राशीतून दरवर्षी धार्मिक विषयावर समाज उपयोगी कार्यक्रम करतात हे निश्चितच कौतुकास्पद आहे. आत्तापर्यंत भगवान जगन्नाथ कथा, जगदीश कथा, लक्ष्मी महिमा तसेच २०२४ मध्ये देवी भागवत कथा यांचे माझ्या माध्यमातून विवेचन केले आहे, हे समाजासाठी धार्मिक सौख्य राहण्याकरता निश्चितच मदत करते असे



प्रतिपादन गौडीया वैष्णवाचार्य व कथावाचक श्री युगल शरण जी महाराज यांनी केले.

युगलशरणजी महाराज पुढे सांगतात की हनुमान चे चरित्र अद्भुत, अनाकलनीय आहे तेच समजून घेतले पाहिजे हनुमान हा महावीर व महाबली आहे. हनुमानाचे समर्पण,सेवा,भक्ती या गुणांचा अंगीकार करावा. हनुमान हा रामाचा असा भक्त आहे की,ज्यांचा कर्जात स्वतः प्रभु रामचंद्र आहेत.हनुमानाच्या सेवेमुळे श्रीराम हे हनुमानाचे कर्जदार आहेत.प्रभु रामचंद्राचे शरण गेलेले सर्वांना काहीना काही दिले परंतू हनुमान असा भक्त आहे की त्याला रामाच्या चरणाजवळ राहून रामरायाची सेवा करायची आहे हनुमान हा निर्धनांच्या कैवारी आहे. दुःख हरणार आहे.

हनुमानचा महिमा अगात आहे यावेळी हनुमान चालीसा कशी निर्माण झाली याची कथाही त्यांनी यावेळी त्यांनी सांगितली. हनुमान जन्म,हनुमान लीला समजणे हेच हनुमान कथेचे रहस्य आहे तसेच हनुमानाचे महत्त्व सांगणारे जय जय हनुमान करू सदा तेरा गुणगान, महाबली हनुमान सहारा निबल का, दुःख भजन मारुती नंदन ,शंकर सुवन केसरी नंदन तेज प्रतापी, बाजे शंख नगाडे, अंजना के घर ललना पधारे यासारखी भजने सादर केली.

प्रथमत रामकृष्ण जानकी जय बोलो हनुमान की च्या जयघोषात लाल टाकी परिसरातून वैष्णवी भजनी मंडळाचे वतीने श्री हनुमान कथेनिमित्त लाल टाकी परिसरातून हनुमान कथेची शोभायात्रा काढून करण्यात आली प्रभू श्रीराम, सीता, राम भक्त श्री हनुमान आदी वेशभूषा केलेली छोटे चिमुकले तसेच मंगलकलश डोक्यावर घेउन वैष्णवी भजनी मंडळ महिला सदस्या व पुरूषांनी हनुमानकथा डोक्यावर घेउन शोभायात्रेत सहभागी होते. वैष्णवी भजनी मंडळ सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

हनुमान कथेची पूजा करण्यात आली मोहनलाल मानधना, गोपाल जाखोटिया, नंदलाल मनियार, जगन्नाथ बजाज,विनोद मालपाणी, जगदिश लढ्ढा,धनेश लढ्ढा आदी मान्यवराच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कथेस प्रारंभ करण्यात आला.

खाकीदास मठात वैष्णवी भजनी मंडळ आयोजित श्री हनुमान कथा कथावाचक गौडीया वैष्णवाचार्य श्री युगलशरणजी महाराज यांच्या मुखातून हनुमान कथा सांगण्यास आज पासून सुरुवात झाली.

# पत्रकारिता व सामाजिक कार्यात भाऊसाहेब वाकचौरे यांचा गौरव

## नाशिक येथे मानाचा पुरस्कार प्रदान!

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

नाशिक येथील मार्कंडेय प्रकाशन, आपली दुनियादारी व वृत्तगंध प्रभा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष कार्यक्रमात अकोले तालुक्याचे भूमीपुत्र, निर्भीड पत्रकार व भारतीय जनता पक्षाचे निष्ठावंत नेते भाऊसाहेब वाकचौरे यांना पत्रकारिता व सामाजिक कार्याबद्दल कर्तृत्वाचा गौरव पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. हा सोहळा नाशिक येथे संपन्न झाला.

या प्रसंगी जागृत भारत विश्व अभियानचे प्रवर्तक स्वामी कंठानंद महाराज तसेच राजयोगिनी ब्रह्मकुमारी वासंती दिदी यांच्या शुभहस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन मार्कंडेय समूहाचे संपादक कवी कुमार कडलग, वृत्तगंध प्रभाचे संपादक रश्मी मारवाडी व सहसंपादक पल्लवी शेटे यांनी केले होते. यावेळी लातूर जिल्हा बँकेचे व्हा. चेअरमन पाटील, सार्वभौमचे संपादक सागर शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

अकोले तालुक्यातील कळस सारख्या गावातून सामाजिक व राजकीय प्रवास सुरू करणाऱ्या भाऊसाहेब वाकचौरे यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून विद्यार्थी संघटन उभे केले. ज्या काळात भाजप मध्ये प्रवेश कमी होता, त्या काळात आदिवासी तालुक्यात भाजपचे संघटन मजबूत करण्याचे कार्य त्यांनी केले. अनेक दैनिकांत त्यांनी निर्भीड पत्रकार म्हणून काम केले. अत्यंत कमी वयात कळस गावचे सरपंच पद भूषवून त्यांनी विविध विकास




योजना प्रभावीपणे राबवल्या.

भाजप सरकारच्या काळात संजय गांधी निराधार योजना समितीच्या माध्यमातून अनेक अंध, अपंग, गरीब, निराधार, विधवा, परित्यक्ता व वृद्ध लाभार्थ्यांना शासकीय मानधन मिळवून देण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. तसेच महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून दरवर्षी गरीब व गरजू विद्यार्थ्यांना वह्या व शालेय साहित्याचे वाटप, तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात येतो.

तंटामुक्त गाव समिती व सरपंच म्हणून त्यांनी तंटामुक्त गाव, निर्मल ग्राम, यशवंत ग्राम समृद्धी, घरकुल योजना यांसारख्या योजनांचा लाभ गावकऱ्यांना मिळवून दिला. जयकिसान सहकारी दूध उत्पादक संस्थाचे चेअरमन तसेच शेतकरी सल्ला समितीचे सदस्य म्हणून त्यांनी दुग्ध व्यवसाय व शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले. विशेष कार्यकारी अधिकारी (महाराष्ट्र शासन) म्हणूनही त्यांनी सामाजिक न्यायासाठी योगदान दिले आहे.

भाऊसाहेब वाकचौरे यांच्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाच्या माहिती संचालनालयाकडून सोशल मीडिया महामित्र पुरस्कार त्यांना देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ (पुणे ग्रामीण) उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार, ध्येय उद्योग समूह व दै. युवाध्येयचा राज्यस्तरीय ध्येयरत्न पुरस्कारही त्यांनी प्राप्त केला आहे. या मानाच्या पुरस्कारामुळे भाऊसाहेब वाकचौरे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून त्यांच्या कार्याबद्दल कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# थंड सकाळ आणि शांत आरोग्य धोके : हिवाळ्यात काळजी घेण्याचे डॉक्टरांचे आवाहन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रातील ग्रामीण व निमशहरी भागात हिवाळा सुरू होत असताना, मेडिकव्हर हॉस्पिटल्समधील तज्ज्ञ डॉक्टरांनी विशेषतः पहाटेच्या वेळेत उद्भवणाऱ्या शांत पण गंभीर आरोग्य आपत्कालीन परिस्थितींबाबत नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

हृदयतज्ज्ञ डॉ. सूरज पाटील यांनी सांगितले की, थंड तापमानामुळे रक्तवाहिन्या आकुंचन पावतात, ज्यामुळे रक्तदाबात अचानक वाढ होण्याचा धोका निर्माण होतो. क्लिनिकल निरीक्षणानुसार, हिवाळ्यात महाराष्ट्रातील ग्रामीण आणि निमशहरी भागात हृदयविकार व मेंदूविकार (स्ट्रोक) रुग्णसंख्येत सुमारे 25 ते 30 टक्क्यांनी वाढ दिसून येते.

सामान्य वैद्यांच्या मते, ग्रामीण भागातील सुमारे 60 टक्के हृदयविकाराच्या रुग्णांकडून सुरुवातीची लक्षणे दुर्लक्षित केली जातात. ही लक्षणे थंडीमुळे आलेली थकवा किंवा पोटाच्या (गॅस्ट्रिक) त्रासाशी जोडली जात असल्याचे आढळते.

न्यूरोसर्जन डॉ. निनाद पाटील यांनी स्पष्ट केले की, उच्च रक्तदाब आणि मधुमेह हे हिवाळ्यातील सुमारे 65 टक्क्यांहून अधिक स्ट्रोक प्रकरणांचे प्रमुख कारण ठरतात. वेळेत उपचार न मिळाल्यास मेंदूविकारामुळे कायमस्वरूपी अपंगत्व येण्याचा धोका वाढतो, असेही त्यांनी नमूद केले.

डॉक्टरांनी या बाबीबद्दलही चिंता व्यक्त केली की अनेक जण पहाटेच दैनंदिन कामे सुरू करतात. "सूर्योदयापूर्वी थंड हवामानाचा थेट संपर्क हा हृदय व मेंदूविकाराच्या घटनांना कारणीभूत ठरू शकतो," असा इशारा तज्ज्ञांनी दिला.

आणखी एक गंभीर अडचण म्हणजे उपचारांसाठी होणारा विलंब. अंदाजानुसार, ग्रामीण भागातील 35 टक्क्यांहून अधिक रुग्ण 'गोल्डन अवर' नंतर रुग्णालयात पोहोचतात, ज्यामुळे पूर्ण बरे होण्याची शक्यता लक्षणीयरीत्या कमी होते.

मेडिकव्हर हॉस्पिटल्सच्या डॉक्टरांनी नागरिकांना सूर्योदयानंतरच बाहेरची कामे सुरू करण्याचा, नियमित आरोग्य तपासणी करून घेण्याचा आणि छातीत दुखणे, श्वास घेण्यास त्रास, अचानक अशक्तपणा, बोलण्यात अडचण किंवा चक्कर येणे अशी लक्षणे आढळल्यास त्वरित वैद्यकीय मदत घेण्याचा सल्ला दिला.

# प्राथमिक आरोग्य केंद्राचा लोकार्पण सोहळा आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या हस्ते संपन्न!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील शेंडी येथे नव्याने उभारण्यात आलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राचा लोकार्पण सोहळा अकोले विधानसभेचे आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या शुभहस्ते उत्साहात पार पडला.

या प्राथमिक आरोग्य केंद्रामुळे शेंडी गावासह परिसरातील नागरिकांना दर्जेदार, तातडीच्या व सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध होणार आहेत. तसेच शेंडी परिसरात येणाऱ्या बाहेरगावी व राज्याबाहेरील पर्यटकांनाही आपत्कालीन परिस्थितीत त्वरित उपचार मिळण्यास मोठी मदत होणार आहे.

सार्वजनिक आरोग्य सुविधा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने हे आरोग्य केंद्र महत्त्वाची भूमिका



बजावणार असून, ग्रामीण भागातील नागरिकांना शहराकडे धाव घ्यावी लागणार नाही, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

लोककल्याण हेच प्रशासनाचे मुख्य ध्येय असून, आरोग्यदायी समाजनिर्मितीच्या दिशेने हे एक ठोस व सकारात्मक पाऊल असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

# सावित्रीबाई फुले महिलांसाठी एक प्रेरणास्रोत

**आळेफाटा : (समर्थ गांवकरी)**

संत सावता महाराज देवस्थान ट्रस्ट, आळेफाटा यांनी महिला मुक्तिदिन व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आळेफाटा येथील संत सावता महाराज मंदिरात आयोजित कार्यक्रमात विनोदातून समाजप्रबोधन करत असताना ह. भ. प. गोविंदमहाराज गायकवाड बोलत होते. उपस्थितांना हसवता हसवता वाईट चालीरिती सोडून द्या व झाडे लावा झाडे जगवा असा संदेश देखील दिला. कार्यक्रमाच्या प्रसंगी देवस्थानचे उपाध्यक्ष सुरेश गडगे यांनी प्रास्ताविक केले तर चैतन्य वाघमारे , सचिन वाळुंज, जालिंदर गागरे, मनीषा देवकर, अनंतराव चौगुले यांनी आपले विचार व्यक्त केले.

# सोनालिकाची १२,३९२ ट्रॅक्टरची विक्रीसह दमदार कामगिरी

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतातील नंबर १ ट्रॅक्टर निर्यात ब्रँड सोनालिका ट्रॅक्टरने कॅलेंडर वर्ष २०२५ चा शेवट एका शक्तिशाली उच्चांकाने केला आहे. या ब्रँडने डिसेंबरमध्ये १२,३९२ ट्रॅक्टरची आतापर्यंतची सर्वाधिक विक्री नोंदवली आहे. कामगिरीचे हे नवीन शिखर विक्रमी कामगिरी आणि नवीन टप्पे यांनी पूरेपूर भरलेल्या या ऐतिहासिक वर्षाचा परिपूर्ण कळस आहे.

भारतातील विविध शेती परिस्थितींच्या दृष्टीने रचना करण्यात आलेली उत्पादने देण्यावर सातत्याने लक्ष केंद्रित करत असल्याचे सोनालिकाच्या या नवीनतम कामगिरीवरून दिसून येते. सोनालिकाचा प्रत्येक ट्रॅक्टर हा दमदार गुणवत्तेचे प्रतीक असून तो नव्या युगातील तंत्रज्ञान आणि डिझाइनने पूर्णपणे सज्ज आहे. तो शेतकऱ्यांना उपयोगातील




विश्वासार्हता आणि दीर्घकालीन मूल्य प्रदान करतो. गेल्या काही वर्षांत सोनालिकाने शेतकऱ्यांच्या तपशीलवार माहितीनुसार डिझाइन केलेले हेवी-ड्युटी ट्रॅक्टर तयार करण्याचा एक अभिमानास्पद वारसा आणि मजबूत प्रतिष्ठा स्थापित केली आहे. या दृष्टिकोनामुळे १८ लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना उज्ज्वल भविष्याची हमी मिळाली आहे. कंपनीची होशियारपूरच्या प्लांटमधील जगातील नंबर १ उत्पादन क्षमता आणि त्याच्या जोडीला विस्तृत चॅनेल पार्टनर नेटवर्क यांमुळे प्रत्यक्ष शेतात कार्यक्षमता वाढवणारे प्रगत ट्रॅक्टर वेळेवर उपलब्ध होतात.

या दमदार कामगिरीबद्दल आपले मत मांडताना, इंटरनॅशनल ट्रॅक्टर लिमिटेडचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. रमण मित्तल म्हणाले, "विविध परिस्थितीतील शेतीसाठी नाविन्यपूर्ण ट्रॅक्टरसह 'दम' प्रदान करण्यावर लक्ष केंद्रित करण्यावर आमच्या दीर्घकालीन दृष्टिकोनाला डिसेंबरमधील १२,३९२ ट्रॅक्टरची विक्रीच्या या नवीन कामगिरीमुळे बळकटी मिळाली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत रब्बी पेरणीच्या क्षेत्रात लक्षणीय वाढ झाली आहे, त्यामुळे पिकांचे भवितव्य आशादायक असून नाविन्यपूर्ण यंत्रसामग्रीद्वारे स्थिर वाढीची अपेक्षा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. नवीन वर्ष २०२६ मध्ये आपण पुढे जात असताना, तंत्रज्ञान आधारित उत्पादनांच्या माध्यमातून शेतीच्या यांत्रिकीकरणाला वाढीस चालना देण्यासाठी आम्ही सर्वजण सज्ज आहोत.

# ड्युव्हील इस्टेटसचा कामगार वसाहतीतील मुलांसाठी उपक्रम

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

ड्युव्हील इस्टेटसने आपल्या सामाजिक उपक्रम ब्रँड 'ड्युव्हील केअर्स' अंतर्गत कामगार वसाहतीत 'टॉय डोनेशन ड्राइव्ह' आयोजित करून सणासुदीचा काळ आपुलकी आणि संवेदनशीलतेने साजरा केला. रिव्हरडेल हाइट्स, रिव्हरडेल रेसिडेन्सेस आणि रिव्हरडेल स्वीट्स या संकुलांमधील सुमारे सहा हजार रहिवाशांचा समावेश असलेल्या ग्राहक समुदायाकडून मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदविण्यात आला. या ड्युव्हील एनव्हॉईजसोबतच रिव्हरडेल साइट ऑफिसच्या टीम्सही सहभागी झाल्या होत्या. कामगार वसाहतीतील मुलांना आनंद देण्यासाठी सर्वच जण एकत्र आले होते. या उपक्रमाचा समारोप ख्रिसमस साजरा करून करण्यात आला. विविध निवासी संकुलांमध्ये राबविण्यात आलेल्या टॉय डोनेशन ड्राइव्हमधून जमा केलेली खेळणी




कामगार वसाहतीतील मुलांना वितरित करण्यात आली. भेटवस्तू मिळाल्याचा आनंद मुलांच्या चेहऱ्यावरील स्पष्टपणे झळकत होता. आनंद व आपुलकीचा हा क्षण व साध्या दयाळूपणाची कृती किती अर्थपूर्ण ठरू शकते, हे यानिमित्ताने अधोरेखित झाले. सणासुदीच्या काळात कामगार वसाहतीतील मुलांसोबत भावना शेअर करण्याच्या कल्पनेतून सुरू झालेला हा उपक्रम विद्यमान ग्राहक समुदायाकडून वंचित मुलांसाठी राबविण्यात आलेल्या व्यापक 'टॉय डोनेशन ड्राइव्ह'मध्ये परिवर्तित झाला.

यामुळे ड्युव्हील इस्टेटसची भौतिक पायाभूत सुविधा उभारण्यापलीकडे जाऊन सहानुभूती, सहभाग आणि एकात्मता वाढविणाऱ्या समुदाय निर्मितीबाबतची कटिबद्धता पुन्हा एकदा अधोरेखित झाली. ग्राहक, कर्मचारी, बांधकाम कामगारांची मुले आणि भागीदार अशा सर्व घटकांमध्ये एकोपा निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. या उपक्रमामुळे रिव्हरडेलमधील विद्यमान ग्राहक समुदाय एकत्र आला आणि ड्युव्हील इकोसिस्टमशी संबंधित या मुलांच्या जीवनात आनंदाचे क्षण पेरून गेला.

# भव्य महिला सन्मान सोहळा व मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न!

**छत्रपती संभाजीनगर : (समर्थ गांवकरी)**

सबला उत्कर्ष फाउंडेशन, मीरा नगर पडेगाव (छत्रपती संभाजीनगर) यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महिला सन्मान सोहळा व महिला आरोग्य हेल्थ चेकअप कॅम्प पडेगाव येथे उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. तस्किन शेख (जिल्हा हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर) तसेच योजना चव्हाण (घाटी हॉस्पिटल – वैद्यकीय क्षेत्र) उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

कार्यक्रमात सबला उत्कर्ष फाउंडेशनच्या अध्यक्षा राजश्री चौधरी, उपाध्यक्ष जागृती चौधरी व सहसचिव राहुल श्री परदेशी यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन



सन्मान करण्यात आला.

यावेळी बोलताना डॉ. तस्किन शेख म्हणाल्या, "क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त या सामाजिक उपक्रमात सहभागी होण्याचा मला विशेष आनंद आहे. महिलांच्या आरोग्यविषयक कोणत्याही गरजेसाठी मी सदैव मदतीस तयार आहे."

फाउंडेशनच्या अध्यक्षा राजश्री चौधरी यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका आणि महिला शिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले यांनी समाजातील महिला व वंचित घटकांना शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम केले. आज आपण शिक्षित आहोत, हे त्यांच्या कार्यामुळेच. या प्रेरणेतूनच हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला."

या कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्त्या, शिक्षिका, महिला बचत गट सदस्य, आशा वर्कर्स, ब्युटीशियन, वैद्यकीय, न्याय, आर्मी व सामाजिक क्षेत्रातील महिलांचा सन्मान करण्यात आला. पोलीस कर्मचारी निवडणूक ड्युटीवर असल्याने त्यांचा सन्मान त्यांच्या कार्यस्थळी जाऊन करण्यात आला.

सन्मानितांमध्ये राधा प्रकाश धनवई, दिपाली दिलीप अंभोरे, माधुरी लहू नरवडे, नंदिनी पवन धनवे, मीरा बोरडे, सविता जीवन पंडित, फेस खान, राहुल श्री परदेशी, भाऊराव निकाळे, भानुदास सनांसे (निवृत्त आर्मी अधिकारी), तसेच लिटील एंजल स्कूल मीरा नगर येथील शिक्षिका पुनम चव्हाण, शितल बरडे, दिपाली काकडे आणि अनेक आशा वर्कर्स यांचा समावेश होता.

# मुंबई महापालिकेच्या राजकारणात मोठा उलथापालथीचा संकेत!

**(समर्थ गांवकरी)**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यातील वाढत्या भेटी-गाठींमुळे महाराष्ट्राच्या, विशेषतः मुंबईच्या राजकारणात नवे समीकरण आकाराला येत असल्याची चर्चा जोर धरू लागली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, विशेषतः मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या भेटींना केवळ कौटुंबिक किंवा औपचारिक स्वरूप न राहता ठळक राजकीय अर्थ प्राप्त होत आहे.

गेल्या तीन ते चार महिन्यांत राज आणि उद्धव ठाकरे यांच्यात जवळपास सहा ते सात वेळा भेटी झाल्या आहेत. ऑक्टोबर महिन्यातच दोन महत्त्वाच्या



भेटी पार पडल्या. ६ ऑक्टोबर रोजी दोघांमध्ये चर्चा झाली, तर १२ ऑक्टोबर रोजी राज ठाकरे यांनी 'मातोश्री' वर जाऊन उद्धव ठाकरेंची स्नेहभोजनासाठी भेट घेतली. याआधी जुलै महिन्यात हिंदी सक्तीच्या निर्णयाविरोधात दोघे मराठी अस्मितेच्या मुद्द्यावर एकत्र व्यासपीठावर आले होते.

वरळी डोममध्ये पार पडलेल्या त्या विजयी मेळाव्यात व्यासपीठावर कोणत्याही पक्षाचा झेंडा नव्हता. केवळ ठाकरे बंधू उपस्थित होते. याच वेळी उद्धव ठाकरे यांनी केलेले, "एकत्र आलोय, एकत्र राहण्यासाठी," हे विधान अनेक राजकीय अर्थांनी तपासलं गेलं. त्यानंतर राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंच्या वाढदिवसानिमित्त मातोश्रीवर जाऊन शुभेच्छा दिल्या. सप्टेंबरमध्ये उद्धव ठाकरे पत्नी रश्मी ठाकरे आणि पुत्र आदित्य ठाकरे यांच्यासह राज ठाकरे यांच्या दादरमधील 'शिवतीर्थ' निवासस्थानी गणपती दर्शनासाठी पोहोचले. या सर्व घडामोडींमुळे "ठाकरे बंधू पुन्हा एकत्र?" हा प्रश्न राजकीय वर्तुळात सातत्याने विचारला जात आहे.

महापालिका निवडणुकांच्या तोंडावरच दोन्ही नेत्यांकडून आलेली वक्तव्ये ही चर्चांना अधिक धार देणारी ठरली. राज ठाकरे यांनी एका मुलाखतीत, "महाराष्ट्र आणि मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी आपले वाद किरकोळ आहेत," असं सांगत एकत्र येण्याबाबत सकारात्मक सूर लावला. त्यावर उद्धव ठाकरे यांनीही, "महाराष्ट्राच्या हितासाठी भांडणं बाजूला ठेवायला मी तयार आहे, पण भूमिका स्पष्ट

## डॉ. विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून

असली पाहिजे," असं उत्तर देत काही अटी अधोरेखित केल्या.

अलीकडे उद्धव ठाकरे यांनी "संदेश कशाला? आम्ही जी काही द्यायची ती थेट बातमीच देऊ," असं सूचक विधान करत पुन्हा एकदा संभाव्य युतीबाबत उत्सुकता वाढवली आहे.

राजकीय विश्लेषकांच्या मते, ठाकरे बंधू एकत्र आले तर सर्वात मोठा फायदा मराठी मतांचं होणारं विभाजन थांबण्याचा होऊ शकतो. सध्या मुंबईत मराठी मतदारांची टक्केवारी २५ ते ३० टक्क्यांच्या आसपास असल्याचं मानलं जातं. ही मतं शिवसेना (उद्धव गट) आणि मनसेमध्ये विभागली गेली तर त्याचा फायदा सत्ताधारी महायुतीला होतो. मात्र, ही मतं एकत्र आली तर मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत चित्र बदलू शकतं.

मनसेकडे आक्रमक नरेटीव्ह, भाषणशैली आणि सामान्य कार्यकर्त्यांची ताकद आहे. शिवसेना (उद्धव गट) कडे संघटनात्मक केडर, अनुभव आणि मुंबईतील जुनं नेटवर्क आहे. या दोन्ही शक्ती एकत्र आल्यास महापालिकेत प्रभावी आव्हान उभं राहू शकतं, असं तज्ज्ञांचं मत आहे.

मात्र, या संभाव्य युतीसमोर काही अडथळेही आहेत. राज ठाकरे यांच्या काही भूमिकांमुळे, विशेषतः मशिदींवरील भोंग्यांच्या मुद्द्यावर घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे, काही वर्ग नाराज होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे उद्धव ठाकरे यांच्या बदललेल्या राजकीय भूमिकेमुळे त्यांच्या पक्षाशी जोडले गेलेले काही मतदार या युतीकडे संशयाने पाहू शकतात.

तसेच, दोन्ही नेत्यांचा मतदारवर्ग एकमेकांकडे सहज ट्रान्सफर होईल का, हा मोठा प्रश्न आहे. "एक आणि एक दोन होईल की दीड?" अशी शंका काही राजकीय विश्लेषक व्यक्त करतात.

मुंबई ही ठाकरे कुटुंबाची पारंपरिक राजकीय ताकद मानली जाते. शिवसेनेचा आत्मा असलेली ही महानगरपालिका गमावू नये, यासाठी उद्धव ठाकरे प्रयत्नशील असल्याचं बोललं जातं. त्यामुळेच ही संभाव्य युती केवळ मुंबईपुरती मर्यादित असली तरी ती अत्यंत निर्णायक ठरू शकते.

राजकीय निरीक्षकांच्या मते, ठाकरे बंधू एकत्र आले तर सत्ताधारी महायुतीसमोर मोठं आव्हान उभं राहू शकतं. विशेषतः मराठी अस्मिता, स्थानिक प्रश्न आणि महापालिकेतील सत्तेचा मुद्दा हे या युतीचे मुख्य अजेंडे ठरू शकतात.

राज आणि उद्धव ठाकरे यांच्या वाढत्या भेटी-गाठी केवळ भावनिक किंवा कौटुंबिक नसून त्या महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या पर्वाची नांदी ठरू शकतात.

# अभ्यास, व्यायाम व कला यातून व्यक्तीमत्व घडते

**डॉ. संजय गोर्डे**

## सर्वोदय विद्या मंदिर खिरविरे येथे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषीक वितरण समारंभ उत्साहात संपन्न

**राजूर :** (समर्थ गांवकरी)

आळस,अज्ञान, अंधश्रद्धा हे तीन शत्रू आयुष्यातून काढून टाका.अभ्यासाने मेंदू,व्यायामाने शरीर तर कलेने मन ताकदवान बनते.म्हणूनच अभ्यास, व्यायाम व कला यातून व्यक्तीमत्व घडते असे प्रतिपादन साहित्यिक व व्याख्याते डॉ.संजय गोर्डे यांनी केले.

राजूर येथील सत्यनिकेतन संस्थेचे सर्वोदय विद्या मंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय खिरविरे येथे वार्षिक स्नेहसंमेलन व वार्षिक पारितोषीक वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला.यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. संजय गोर्डे विचार मंच्यावरून बोलत होते. यावेळी संस्थेचे संचालक श्रीराम पन्हाळे हे अध्यक्षस्थानी होते.



या प्रसंगी संचालक मिलिंदशेठ उमराणी,अशोक मिस्त्री,नंदकिशोर बेल्हेकर,रामजी काठे,निरीक्षक लहानू पर्बत,माजी प्राचार्य मनोहर लेंडे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दशरथ कुलाळ,उपाध्यक्ष त्रिंबक पराड,बाजिनाना भांगरे यांसह प्राचार्य मधुकर मोखरे,लिपीक भास्कर सदगीर,प्रवीण मालुंजकर,भाऊसाहेब कोते,ठकुबाई भांगरे,राजेविनोद साबळे,विक्रम आंबरे,सुधीर पराड,रामदास डगळे,योगेश बगाड, एस.बी.घोलप,पी. एन.भांगरे,एस.ए. मोहटे,एन. डी.डगळे,एस.एन.वाकचौरे,वाय. के.शिंदे,पी.के.बेणके, विद्यार्थी प्रतिनिधी रूपाली डगळे यांसह विद्यार्थी, ग्रामस्थ उपस्थित होते.

डॉ.गोर्डे यांनी पुढे मार्गदर्शन करताना शाळा हे उदयाच गाव आहे.जीवन जगत असताना मोबाईल,मित्र,क्रिकेट, टिव्ही,गाडी या पाच शत्रूंपासून दुर रहा. चांगला विचार आत्मसात करा. विषय अवघड नसतो मनोवृत्ती बदला. खुप मोठे व्हा. खऱ्याच्या व गरिबाच्या पाठिशी उभे रहा. व्यसनापासून दूर रहा.परिस्थिती बदला.स्वतःला दुबळे समजू नका. जास्तीत जास्त ज्ञान आत्मसात करा.कारण ज्याच्याकडे ज्ञान त्याला जीवनात काहीच कमी नाही असे विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीराम पन्हाळे यांनी पाठीवर शब्बासकिची थाप महत्त्वाची असते.स्पर्धांत भाग घ्या.सराव करा.आयुष्यात कोणतेच काम लहान नाही. हार न मानता धैर्याने सामोरे जा. कुटुंब,शाळा व गावाचे नाव रोशन करा.असे प्रतिपादन केले.

यावेळी संचालक मिलिंदशेठ उमराणी, अशोक मिस्त्री,नंदकिशोर बेल्हेकर आदी मान्यवरांनी मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले.

शैक्षणिक वर्षात कला,क्रिडा, सांस्कृतीक,चित्रकला,वेशभुषा,

वक्तृत्व, निबंध लेखन यांसारख्या विविध क्षेत्रात विशेष नैपुण्य संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व शालेय साहित्य देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्तावीक व स्वागत प्राचार्य मधुकर मोखरे यांनी केले. सुत्रसंचलन राजेविनोद साबळे यांनी केले.तर विक्रम आंबरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाची सांगता मिष्टान्न भोजनाने करण्यात आली.यासाठी विद्यालयाचे माजी विद्यार्थ्यांचे विशेष योगदान लाभले.

# कंधार व लोहा तालुक्यातील ९ तांड्यांना महसुली दर्जा मिळाला - भगवान राठोड

**कंधारः** (समर्थ गांवकरी)

राज्यशासनाने डोंगर कपारीत असलेल्या कंधार व लोहा तालुक्यातील ९ तांड्यांना महसुली दर्जा मिळवून दिल्याची माहिती संत सेवालाल महाराज बंजारा लमान तांडा समृद्धी योजनेचे जिल्हा स्तरीय समितीचे अशासकीय सदस्य भगवान राठोड यांनी दिली.

तांड्यांना विकासाच्या वाटेवर आणण्यासाठी राज्यशासनाने संत सेवालाल महाराज बंजारा लमान तांडा समृद्धी योजना" राज्यभरात सुरू केली. नांदेड जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या तांड्याना महसूली दर्जा व ग्रामपंचायतचा दर्जा देण्यात यावा, यासाठी अनेक वर्षापासून मागणी केली जात होती. गाव अंतर्गत येणाऱ्या तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायत नसल्याने तांडे विकासापासून दूर राहत असल्याची भावना समाज बांधवांमध्ये होती.



ग्रामपंचायत अंतर्गत वेगवेगळे विकास कामे राबवून गावाचा विकास केला जातो परंतु जिल्ह्यातील अनेक तांड्यामध्ये ग्रामपंचायत नसल्याकारणाने तांड्याचा अपेक्षित विकास साधायला अडचणी येत होत्या. या अडचणी मार्गी लावण्यासाठी राज्यशासनाने "संत सेवालाल महाराज बंजारा लमानतांडा समृद्धी योजना" सुरू केली. या योजनेचा फायदा बंजारा समाजाला होत असून कंधार व लोहा तालुक्यात नवीन ९ ग्रामपंचायती उदयास आल्या आहेत.

३१ डिसेंबर २०२५ रोजी शासनाने निर्गमित केलेल्या आदेशात कंधार तालुक्यातील नागलगाव ग्रामपंचायतचे विभाजन करून दुर्गातांडा व उदातांडा, शिराढोण ग्रामपंचायतचे विभाजन करून नाईकनगर तर लोहा तालुक्यातील उमरा ग्रामपंचायतचे विभाजन करून धनाजीतांडा, परसरामतांडा, रूपशिंगतांडा, फुलमळातांडा, गोविंदतांडा, आणि लिंबोटी ग्रामपंचायतचे विभाजन करून येलदरी तांडा अशा एकुण ९ तांड्याना महसुली दर्जा प्राप्त होऊन, स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याचे शासनाचे आदेश प्राप्त झाल्याची माहितीही राठोड यांनी दिली.

# भारतीय जनता पार्टीच्या अहिल्यानगर चिटणीसपदी कुणाल भंडारी यांची निवड

- भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते नियुक्ती पत्र प्रदान

**अहिल्यानगर :** (समर्थ गांवकरी)

मुंबई येथे भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते कुणाल भंडारी यांना अहिल्यानगर शहर चिटणीस पदी नियुक्तीचे पत्र देण्यात आले.

याप्रसंगी भारतीय जनता पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते,जेष्ठ पदाधिकारी अशोक गायकवाड,रवी नामदे, विवेक नाईक आदी उपस्थित होते.

गेल्या अनेक वर्षापासून कुणाल भंडारी यांनी पक्षासाठी संघटनात्मक काम करीत असून संघटन बांधण्याचे कार्य केलेले आहे.समाजातील वंचित



घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आपण महत्त्वाचे योगदान देत आहेत.

कुणाल भंडारी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ वस्ती प्रमुख धर्म जागरण बेटी बचाव जिल्हा प्रमुख,बजरंग दल शहर संयोजक,जिल्हा संयोजक, बागेश्वर धाम प्रदेश उपाध्यक्ष अशी पदे भूषवली आहेत.लव्ह जिहाद,गोरक्षण,लँड जिहाद, हिंदुत्वाचे प्रखर कार्य अहिल्या नगर शहर जिल्ह्यामध्ये युवकांचे मोठे संघटन करून हिंदुत्वाचे जाळे तयार केले. कापड बाजार अतिक्रमण,हिंदू व्यापारी यांच्या वर होणारे हल्ले, या सामाजिक विषयांवर आवाज उठवणे आक्रमक हिंदुत्वादी चेहरा म्हणून त्यांचे कार्य आहे.

# समर्थ फार्मसी मध्ये राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा उत्साहात संपन्न

**बेल्हे :** (समर्थ गांवकरी)

समर्थ रूरल एज्युकेशनल इंस्टिट्यूट संचलित, समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी,बेल्हे व इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशन (आयपीए) स्थानिक शाखा आळेफाटा यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. समर्थ शैक्षणिक संकुलाचे कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयातील ३५ संघ सहभागी झाले होते. स्पर्धा दोन भागात घेण्यात आली.

# बारामती ते शेगाव जाणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यावर हल्ला

- चालक-वाहकाला मारहाण व धमकी, दोघांविरुद्ध गुन्हा दाखल
- एसटी कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**जामखेड :** (समर्थ गांवकरी)

जामखेड बसस्थानक परिसरात एसटी महामंडळाच्या चालक-वाहकावर मारहाण व धमकी दिल्याची धक्कादायक घटना घडली आहे. बारामती आगारातील चालक-कम-वाहक शेख रफिक लतिफ (वय ४०, बेंच नं. ६०५०, रा. बालेपिर, ता. जि. बीड) यांनी याप्रकरणी जामखेड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

फिर्यादी शेख रफिक लतिफ हे दि. ०४ जानेवारी २०२५ रोजी बारामती ते शेगाव (जि. बुलढाणा) या मार्गावरील एसटी



बस क्रमांक MH 14 LX 6083 घेऊन प्रवास करत होते. सकाळी सुमारे १०.१५ वाजता सदर बस जामखेड बसस्थानकात आली असता प्रवासी उतरतानाच अंदाजे ३० वर्षे वयाचा एक अनोळखी इसम चालकाच्या मागील खिडकीतून बसमध्ये चढला.

याबाबत शेख रफिक यांनी त्याला खिडकीतून का चढलास, दरवाजातून येणे आवश्यक होते, असे समजावून सांगितले. मात्र याच कारणावरून त्याच्या सोबत असलेल्या दुसऱ्या अनोळखी इसमाने (वय अंदाजे ३२) शिवीगाळ करत शेख रफिक यांना बसमधून खाली ओढले. त्यानंतर दोघांनी मिळून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच "बस पुढे घेऊन ये, नाहीतर पाहून घेऊ" अशी धमकी दिली.यावेळी बसचे चालक व उपस्थित नागरिकांनी मध्यस्थी करून भांडण सोडवले. त्यानंतर दोन्ही आरोपी घटनास्थळावरून पळून गेले. घटनेनंतर शेख रफिक यांनी ग्रामीण रुग्णालय, जामखेड येथे उपचार घेतले असून त्यानंतर जामखेड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.मारहाण करणाऱ्या इसमांपैकी एकाचे नाव सागर (पूर्ण नाव माहिती नाही), रा. सदाफुले वस्ती, जामखेड असे असल्याचे समजते. या घटनेमुळे एसटी कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून पोलिसांनी तक्रारीच्या आधारे पुढील तपास सुरू केला आहे.

जामखेड बसस्थानकात चालक व वाहक यांच्या स्वरक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आहे तर सर्व सामान्य प्रवाशांचे स्वरक्षण राम भरोसे का?

# विकासासाठी कटिबद्ध : आ. हेमंत पाटील

**नांदेड :** (समर्थ गांवकरी)

शिवसेना राष्ट्रवादी प्रभाग क्र २० मधील उमेदवाराच्या प्रचारार्थ हाडको ईच्छापुर्ती हनुमान मंदीर येथे प्रचाराचा नारळ शिवसेना उपनेते आ हेमंत पाटील .राष्ट्रवादी नेते माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर . आ आनंदराव बोंढारकर . आ बाबुराव कोहळीकर . माजी आ ओमप्रकाश पोकर्णा . मोहन हंबर्डे . सुभाष साबणे . राष्ट्रवादी चे नेते प्रविव पाटील चिखलीकर लोहा नगर परिषदेचे लोकनियुक्ती नगर अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते नारळ फोडून प्रचाराचे शुभारंभ करण्यात आले असून यावेळी आ हेमंत पाटील यांनी आपल्या मनोगत पर भाषणात संबोधीत करताना म्हणाले की राज्यात आमची सत्ता असून नगरविकास खात्याचे मंत्री आमचे नेते महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ भाई शिंदे हे असून



नगरविकास खाते आमच्या कडे असल्यामुळे येत्या निवडणुकीत आमच्या उमेदवारांना भरघोष मतांनी निवडून द्या सिडको हाडको परिसराच्या विकासा साठी आम्ही कटिबद्ध आहोत असे संबोधीत केले तर यावेळी त्यांच्या सह इतर मान्यवरांची भाषणे झाली असून . नांदेड वाघाळा महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ अंतर्गत शिवसेना राष्ट्रवादी कॉग्रेस अजित पवार गट यांच्या वतीने प्रभाग क्र २० च्या ५ उमेदवारा साठी हाडको परिसरातील ईच्छापुर्ती हनुमान मंदीर येथे प्रमुख मान्यवर वरील पदअधिकारी यांच्या हस्ते नारळ फोडून प्रचारास सुरुवात करण्यात आला आहे.

निवडणुक प्रचार शुभारंभ करण्यात आला या वेळी शिवसेना पक्षाच्या वतीने प्रभाग क्र २० मधील सर्वसाधरण पुरुष मध्ये विनय पाटील गीरडे तर सर्वसाधारण महिला सौ रेखाताई विनायक आकुरके . ओबीसी पुरुष संतोष माधवराव कांचनगीरे .ओबीसी महिला सौ योगीता अमोल येरगेवार . राष्ट्रवादी कॉग्रेस अजित पवार गटाच्या एस सि महिला सौ संघमित्रा दिलीप कांबळे यांच्या प्रचारार्थ नेते मंडळीनी सर्व उमेदवारांना भरघोष मतांनी निवडून देण्याचे आवाहन या कार्यक्रमा प्रसंगी करण्यात आले.

तर या कार्यक्रमास परिसरातील नागरीकांसह मोठ्या प्रमाणात शेकडो महिला लाडक्या बहिणीला व शेकडो पुरुषांना केला असून या वेळी परिसरातील राष्ट्रवादी व शिवसेना पक्षाचे पद अधिकारी कार्यकर्ते यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# उत्साहात जयंती साजरी

**जुन्नर तालुका :** (समर्थ गांवकरी)

३ जानेवारी हा भारतीय स्त्रीशक्तीच्या अस्मितेचा, धैर्याचा आणि क्रांतीचा सुवर्णदिन ज्या काळात स्त्रियांनी उंबरठा ओलांडणे हे पाप समजले जायचे, अशा अंधकारमयी काळात ज्ञानाची ज्योत हाती घेऊन ज्या माऊलीने उभ्या स्त्रीजातीसाठी प्रगतीची दारे उघडली,त्या भारतीय स्त्री शिक्षणाच्या जननी, पहिल्या मुख्याध्यापिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा आज जन्मदिन.त्यांच्या पावन स्मृतीस रॉयल एज्युकेशन इंग्लिश स्कूल,ओतूर, परिवारातर्फे विनम्र अभिवादन करण्यात आले. सावित्रीबाईंचा प्रवास हा केवळ एका शिक्षिकेचा प्रवास नव्हता, तर तो एका महायुद्धासारखा होता..!! पुण्याच्या भिडेवाड्यात जेव्हा महात्मा जोतिराव फुले यांनी पहिली मुलींची शाळा काढली.

# शेतीला रात्रीची वीज नको, दिवसा द्या; फुलवळच्या शेतकऱ्यांची वीज वितरणकडे मागणी

**कंधार :** (समर्थ गांवकरी)

शेतीसाठी सध्या रात्रीच्या वेळी वीजपुरवठा केला जात असल्याने शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही अडचण दूर करून शेतीपंपांना दिवसा वीज पुरवण्यात यावी, या मागणीसाठी फुलवळ (ता. कंधार) येथील शेतकऱ्यांनी ५ जानेवारी रोजी महावितरणच्या उपअभियंत्यांना लेखी निवेदन दिले.

सध्या रब्बी हंगाम जोमात असून पिकांना पाणी देण्याची लगबग सुरू आहे. मात्र, महावितरणकडून रात्रीच्या वेळी वीजपुरवठा केला जात आहे. कडाक्याची थंडी, अंधार आणि वन्य प्राण्यांचा धोका पत्करून शेतकऱ्यांना रात्री शेतात पाणी देण्यासाठी जावे लागते. यामुळे शेतकऱ्यांच्या जिवाला धोका निर्माण झाला असून, आरोग्याचे



प्रश्नही उद्भवत आहेत. रात्रीच्या वेळी साप, विंचू आणि इतर हिंस्त्र प्राण्यांची भीती असते.

कडाक्याच्या थंडीमुळे शेतकऱ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे.

अंधारात ओलिताचे काम करताना अनेकदा अपघात घडण्याची शक्यता असते.

या निवेदनावर माजी उपसरपंच संभाजी मंगनाळे यांच्यासह गावातील असंख्य शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. प्रशासनाने या मागणीचा गांभीर्याने विचार करून त्वरित दिवसा वीजपुरवठा सुरू करावा.

# कोलंबी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान

**नायगाव :** (समर्थ गांवकरी)

नायगाव तालुक्यातील कोलंबी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान या योजनेअंतर्गत गावामध्ये विविध विकास कामे करण्यात आली. यावेळी कोलंबी गावामध्ये स्वच्छता अभियान तसेच नालिसफाई, वृक्षलागवड, ग्रामपंचायत डिजिटल करणे, आपले सरकार सेवा केंद्र अद्यावत करणे, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा येथे सौचालय दुरुस्ती, वृक्ष लागवड, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, किचनशेड, परसबाग तसेच स्मशानभूमी येथे वृक्षलागवड, पिण्याच्या पाण्याची व्यवसथा, लाईटची व्यवस्था, बसण्यासाठी सिमेंट बेंच, रंगरगोटी, ग्रामपंचायत व उपकेंद्र मार्फत विविध आरोग्य शिबीर राबविण्यात आले, ग्रामपंचायत, जि. प. शाळा, धार्मिक स्थळें व गावाअंतर्गत सुरक्षितेसाठी सी. सी. टीव्ही कॅमेरे बसवण्यात आले तसेच शासकीय इमारतीना रेन हार्वेस्टिंग चे काम व गावामध्ये करवसुली करण्यात येत आहे तसेच लोकसहभागातून श्रमदान करून वनराई बंधारा उभारण्यात आला. या उपक्रमासाठी सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे तालुकाध्यक्ष तथा ग्रामपंचायत कोलंबीचे कर्तव्यदक्ष ग्रामपंचायत अधिकारी टी. जी. पाटील रातोळीकर, ग्रामपंचायत कर्मचारी, गावातील सर्व विभागाचे कर्मचारी तसेच गावातील सर्व नागरिकांनी या अभियानात सक्रिय सहभाग घेऊन मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

# 'सुड शकारंभ' चित्रपटाचा थरकाप उडवणारा ट्रेलर प्रदर्शित !!

**पुणे :** (समर्थ गांवकरी)

गावकुसाबाहेर पेटलेला सत्तेचा संघर्ष, अहंकारातून उफाळलेला सूड आणि नात्यांची राख करणारा विश्वासघात या सगळ्यांचा अंगावर काटा आणणारा अनुभव देणाऱ्या मराठी ॲक्शन-ड्रामा-थ्रिलर 'सुड शकारंभ' सिनेमाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे. ट्रेलरने रिलीज होताच प्रेक्षकांच्या मनात उत्सुकतेची खळबळ उडवली आहे. हा चित्रपट १६ जानेवारी २०२६ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात चित्रपटगृहात दाखल होणार आहे. शांततेचा मुखवटा पांघरलेलं गाव आणि त्यामागे दडलेली हिंसा ट्रेलरमधून हळूहळू उघड होत जाते. सत्ता अबाधित ठेवण्यासाठी सुरू असलेल्या खेळी, सूडाच्या ज्वाळांमध्ये होरपळणारी माणसं, धारदार संवाद आणि वेगवान




कट्स हे सगळं मिळून ट्रेलरला प्रचंड थरारक बनवतं. ग्रामीण राजकारणाचा काळा चेहरा आणि मानवी स्वभावातील क्रूर बदल ट्रेलर ठसठशीत दाखवतो. शोएब खतीब यांनी कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शनाची धुरा सांभाळत एक तीव्र, वास्तवदर्शी आणि सिनेमॅटिक अनुभव उभा केला आहे. ज्योती पाटील प्रस्तुत आणि राजनील फिल्म प्रोडक्शन निर्मित, दत्तसंग्राम वासमकर - सहयोगी निर्माता यांचे भक्कम पाठबळ लाभले आहे. चित्रपटात मनीषा मोरे, आयुष उलघडे, ओम पानस्कर, सुनील सूर्यवंशी, ऐश्वर्या मल्लिकार्जुन, सोनाली घाडगे, सलोनी लोखंडे, राज साने आणि मारुती केंगार यांच्या प्रभावी भूमिका पाहायला मिळणार आहेत. विकी वाघ यांच्या संगीत आणि पार्श्वसंगीताने अधिक तीव्रता मिळाली सिनेमाला असून, मनीष राजगिरे, हर्षवर्धन वावरे, विकी वाघ आणि मयुरी जाधव यांच्या आवाजाने गाणी भावस्पर्शी झाली आहेत. पॅनोरमा म्युझिकअंतर्गत सिनेमाचं संगीत प्रदर्शित होत आहे.ग्रामीण राजकारणाचे वास्तव टिपण्यासाठी छायाचित्रण रोहण पिंगळ आणि अमेय तानवडे यांनी केले असून, संकलन रोहित रुकडे यांचे आहे. कला दिग्दर्शन सोनाली घाडगे, तर प्रॉडक्शन मॅनेजमेंटची जबाबदारी श्रीराज पाटील -कार्यकारी निर्माता आणि जीत शहा, दिगंबर शिंदे आणि ओंकार गूळीक यांनी सांभाळली आहे. पब्लिसिटी डिझाईन स्कारलेट स्टुडिओज्, पी.आर. प्रज्ञा शेट्टी, सोशल मीडिया अश्मिकी टिळेकर तसेच सीईओ राजेश मेनन आणि सनशाईन स्टुडिओझ यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

जिथे सत्ता बोलते... तिथे माणूस बदलतो. 'सुड शकारंभ' हा केवळ सूडाची कथा नसून, सत्तेच्या खेळात माणूस कसा बदलतो आणि गावाच्या मातीमध्ये कशी रक्तरंजित ज्वाला पेटते याचा एक प्रवास आहे. १६ जानेवारी २०२६ पासून जवळच्या चित्रपटगृहात हा अनुभव नक्की घ्या.

# ब्रेक्स इंडियाच्या रेव्हिया'चे उच्च-कार्यक्षमतेचे क्लचेस केले सादर

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

ब्रेक्स इंडियाने रेव्हिया' क्लचेस सादर करून आपल्या मोबिलिटी सोल्यूशन्स पोर्टफोलिओचा शानदार विस्तार केला आहे. भारतातील विविध ड्रायव्हिंग परिस्थितीत व्यावसायिक वाहने, ट्रक आणि बसेसच्या कामगिरीच्या बिकट गरजा पूर्ण करण्यासाठी या क्लचेसची रचना करण्यात आली आहे.



उंची फ्रिक्शन मटेरियल्स आणि रिनफोर्स्ड स्प्रिंग तंत्रज्ञानाचा वापर करून विकसित केलेल्या रेव्हिया' क्लचेसमध्ये दमदार टिकाऊपणा, श्रेष्ठ उष्णता शोषण (हीट डिसिपेशन) आणि सातत्यपूर्ण पॉवर ट्रान्समिशन मिळते. जड वजन, तीव्र चढउतार, दाट शहरातील रहदारी आणि लांब पल्ल्याच्या ऑपरेशन्समध्येसुद्धा हा लाभ मिळतो. कमी झीज आणि दीर्घ सेवा आयुष्यासाठी त्यांची रचना करण्यात आली असून या क्लचमुळे फ्लीट ऑपरेटर्सना डाउनटाइम कमी करण्यास, देखभाल खर्च कमी करण्यास आणि वाहन अपटाइम जास्तीत जास्त करण्यास मदत होते.

"रेव्हिया' क्लच प्लेट्ससोबतच चाकाभोवतीच्या महत्त्वाच्या उत्पादनांना कव्हर करण्याच्या आपल्या धोरणात ब्रेक्स इंडियाने आणखी एक निर्णायक पाऊल उचलले आहे. ब्रेक सिस्टीमपासून ते क्लचपर्यंत आम्ही भारतासाठी सर्वांगीण मोबिलिटी उत्पादनांच्या आमच्या वचनाला बळकटी आणत आहोत. वाहन थांबवण्यासाठी जे असते त्यासाठी आमची दीर्घकाळापासून ओळख आहे, तोच विश्वास आम्ही त्याला चालवणाऱ्या गोष्टींपर्यंत वाढवत आहोत," असे ब्रेक्स इंडियाचे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि आफ्टरमार्केट बिझनेस युनिटचे प्रमुख श्री. एस. सुजित नायक यांनी सांगितले. सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाच्या ऑटोमोटिव्ह सिस्टीममधील दशकांच्या कौशल्याच्या बळावर रेव्हिया' क्लचेस भारतीय बाजारपेठेसाठी विश्वासार्ह, उच्च-गुणवत्तेचे घटक ऑफर करण्याच्या आपल्या कटिबद्धतेला बळकटी देत आहे.

**क्लच प्लेटची प्रमुख वैशिष्ट्ये**

- सुरळीत संबंध आणि विच्छेद (एंगेजमेंट व डिसएंगेजमेंट)
- उच्च टॉर्क ट्रान्समिशन कार्यक्षमता
- टिकाऊपणा आणि दीर्घायुष्य
- उत्कृष्ट (औष्णिक) थर्मल प्रतिरोधकता
- ओईएम (OEM) मानके पूर्ण करण्यासाठी उत्पादित.

# दिव्यात भाजप प्रेणीत अपक्ष उमेदवार सीमा भगत प्रभाग २७ मधून निवडणुकीच्या रिंगणात

## महायुतीत भाजपने तिकीट नाकारल्याने अपक्ष उमेदवारी

**ठाणे, दिवा : (समर्थ गांवकरी)**

ठाणे महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीच्या दिव्यातील उमेदवारांच्या प्रचाराला जोरदार सुरवात झाली असून महायुतीमुळे भाजपने तिकीट नाकारल्याने अपक्ष उमेदवार म्हणून प्रभाग क्र. 27 (क) सर्वसाधारण महिला गटातून सीमा गणेश भगत ह्या अपक्ष निवडणूक लढवत आहेत. रविवारी दिव्यातील गावदेवी मंदिरात प्रचाराचा नारळ फोडून त्यांनी त्यांच्या प्रचाराला सुरवात करण्यात आली. महिलांनी औक्षण करून सीमा यांचे जनसंपर्क कार्यलयात स्वागत केले श्री प्रभू रामाला आणि गणेश पूजन करून सौ. भगत यांनी आशीर्वाद घेतले. यानंतर नारळ फोडून फटाके वाजवत दिवा परिसरात प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. महायुतीमुळे भाजपने तिकीट नाकारल्याने अपक्ष उमेदवार म्हणून उभे राहण्याचा निर्णय घेऊन अपक्ष म्हणून आपला उमेदवारी अर्ज दाखल केल्याने सीमा भगत यांना निवडणूक आयोगाने हेलिकॉप्टर निशाणी दिली आहे. रविवार असल्याने जास्तीत जास्त नागरिकांच्या भेटी घेण्यावर त्यांनी भर दिला. यावेळी महिला वर्ग आणि नागरिकांचा त्यांना उस्फुर्त असा प्रतिसाद मिळत होता. अनेक सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले पती गणेश भगत यांचा मोठा सहभाग आहे जनतेत त्यांना दांडगा अनुभव असून मोठी ओळख आहे यांचा पुरेपूर वापर करत सीमा भगत यांना प्रभागातील नागरिकांची साथ मिळत आहे.




जनता सुज्ञ असून जनतेच्या पाठिंब्यामुळे आपण अपक्ष निवडणूक लढवत असल्याचे सिमा भगत यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले.

# श्रीसत्य गणपतीचे लाखो भाविक दर्शनाला येणार

- तहसील प्रशासनाच्या वतीने जय्यत तयारी सुरु
- मंदिराचा संपूर्ण परिसर सि.सि.टिव्ही कॅमेऱ्याच्या नजरेत

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**



मराठवाड्यातील जागृत देवस्थान म्हणून ओळख असलेल्या नांदेड - नागपूर रस्त्यावरील अर्धापूर तालुक्यातील दाभड परिसरातील श्रीसत्य गणपती संस्थांच्या वतीने दि.६ मंगळवारी रोजी अंगारिका संकष्ट चतुर्थीती परिसरात जय्यत तयारी केली आहे. महसूल व पोलीस प्रशासन गणेश भक्तांना दर्शन सुलभ होण्यासाठी विशेष व्यवस्था केली आहे. नांदेड - अर्धापूर रस्त्यावरील दाभड (भोकरफाटा) परिसरातील श्रीसत्य गणपती देवस्थान एक जागृत देवस्थान म्हणून मराठवाड्यात प्रसिद्ध आहे. श्रीसत्य गणपतीचे दर्शन घेण्यासाठी दर महिन्याच्या संकष्ट चतुर्थीला गणेश भक्तांची खूप मोठी गर्दी होत असते. अंगारिका चतुर्थिचा योग वर्षातून एकदाच येत असल्याने भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. तहसीलदार तथा प्रशासक रेणुकादास देवनीकर,नायब तहसीलदार संजय शिंदे देवस्थान कर्मचारी व महसूल व पोलीस प्रशासन विशेष व्यवस्था करीत आहे. पार्किंगसाठी व्यवस्था,सावलीसाठी मंडप,दर्शनी रांगा,दर्शनी मार्ग केला असुन विशेष सर्वांना एकाच रांगेत दर्शन घ्यावे लागणार आहे श्रीगणेश भक्तांना मंदिराच्या कमानी पासून दर्शनाला रांगेत जावे लागणार आहे दर्शन रांगेच्या दोन्ही बाजूने संरक्षक कठडे लावण्यात येणार आले आहेत दर्शन झाल्यावर भक्तांनी शांततेत बाहेर पडून सहकार्य करावे असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# सराईत गुन्हेगारावर एमपीडीए अंतर्गत कारवाईचे आदेश

**आळेफाटा : (समर्थ गांवकरी)**

सराईत गुन्हेगार खालीद अहमद गुलामगौस बेपारी (रा. आळे, ता. जुन्नर) याच्यावर आळेफाटा पोलिसांनी एमपीडीए अंतर्गत कारवाई केली आहे. बेपारीवर सात गंभीर गुन्हे दाखल होते. आळेफाटा ठाण्याचे पोलीस निरीक्षक विश्वास जाधव यांनी ही माहिती दिली. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक शांततेत पार पडावी यासाठी सराईत गुन्हेगारांवर कारवाईचे आदेश जिल्हा पोलिस अधीक्षकांनी दिले आहेत. जिल्हाधिकारी जितेंद्र दुडी यांनी बेपारी याच्यावर एमपीडीए अंतर्गत कारवाईचे आदेश दिले. ३० डिसेंबर रोजी ताब्यात घेऊन नागपूर येथील मध्यवर्ती कारागृहात दाखल करत स्थानबद्धाची कारवाई केली.

## भविष्यातील तंत्रज्ञानाची पायाभरणी

# गेट सेट लर्नच्या एआय व रोबोटिक्स बूटकॅम्प्समुळे नवे क्षितिज

**नंदुरबार : (समर्थ गांवकरी)**

नंदुरबारसारख्या दुर्गम जिल्ह्यामध्ये आव्हाने ही साधारणपणे प्रत्यक्ष समोर येत असतात, शाळांमधील अधिक अंतर, बहुभाषिक वर्ग आणि शिक्षक जे तंत्रज्ञानाची फार कमी माहिती घेऊन मोठ्या विद्यार्थी संख्येला शिक्षण देत असतात. गेट सेट लर्न आता सध्याच्या या पध्दतीला सहकार्य करुन प्रथमच स्थानिक संदर्भानुसार कार्यशाळा आणि बुटकॅम्प्सचे आयोजन करत आहे. विद्यार्थी आणि शिक्षकांना आता प्रत्यक्ष उपक्रमांच्या माध्यमातून टप्प्या टप्प्याने शिकण्यासाठी योग्य पध्दतीने स्टेम, रोबोटिक्स, एआय आणि कोडिंग शिकवले जाते.



गेट सेट लर्न चे सह संस्थापक आणि सीईओ या सर्वसमावेशक प्रयत्नांच्या महत्त्वाला अधोरेखित करतात " नंदुरबार सारख्या ठिकाणी भागीदारी महत्त्वपूर्ण ठरते. आम्ही नेहमीच सरकारी संस्था, जिल्हा प्रशासन आणि संस्थां बरोबर नियमितपणे काम करुन विद्यार्थ्यांना नवीन पिढीतील कौशल्य देण्यास उत्सुक संस्थां बरोबर काम करत असतो. आमचे लक्ष्य अगदी सोपे आहे. कौशल्यावर आधारीत कार्यक्रम आणि बुटकॅम्प्सची अंमलबजावणी करुन प्रत्येक वर्गात स्टेम, एआय आणि जीवन कौशल्ये उपलब्ध करुन देणे. ज्यावेळी आम्ही एकत्रित पणे असे उपक्रम सुरु करतो त्यावेळी त्यांचा परिणाम हा अधिक खोलवर होऊ एका कार्यशाळे पेक्षा अधिक होत असतो." असे झवेरी यांनी सांगितले. बुटकॅम्प्स ही पहिली पायरी आहे. विद्यार्थ्यांना सातत्याने रिफ्रेशर्स सेशन्स, मार्गदर्शन आणि टेक होम रोबोटिक्स किट्स मिळतील. शिक्षकांना तंत्रज्ञानावर आधारीत शिक्षणाचे प्रशिक्षण देऊन रोजचा सराव करण्यास देण्यात येणार असून त्याच बरोबर स्थानिक नेत्यां बरोबर एकत्र येऊन शिक्षकां बरोबर भागीदारी करुन समाजाच्या भल्यासाठी काम केले जाणार आहे.

नंदुरबारच्या प्रवासातून अनेक आदिवासी आणि गरीब समाजाला गेट सेट लर्न ला अशी आशा आहे की त्यांचे कार्य अधिक चांगले होईल. जसजशी मुले त्यांचा पहिला रोबो किंवा कोड्स तयार करुन पहिला गेम तयार करतील, तेंव्हा तंत्रज्ञान ही बाहेरची गोष्ट नसेल तर ती त्यांच्या क्षमता आणि कल्पनाशक्तीची एक भरारी असेल जेणेकरुन त्यांची मुळेही सक्षम राहून ते भविष्यातही पुढे जाऊ शकतील.



ठाणे : दिव्यात सिंधुदुर्ग जिल्हा सेवाभावी संस्था दिवा शहर यांचे वार्षिक स्नेहसंमेलन व नूतन वर्ष २०२६ च्या दिनदर्शिका प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात व जल्लोषात दिव्यातील साबे गावातील विठ्ठल मंदिरात पार पडला प्रसंगी सदर कार्यक्रमास दिवा शहरातील सिंधुदुर्ग जिल्हावासी नागरिक, संस्था सभासद तसेच प्रमुख मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. (फोटो - संतोष पडवळ)

# भव्य रॅलीने वेधले ग्रामस्थांचे लक्ष

**किनवट: (समर्थ गांवकरी)**

ब्रेल लिपीचे जनक लुईस ब्रेल यांच्या जयंतीनिमित्त आज बोधडी येथील अंधविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी काढलेल्या भव्य रॅलीने आणि सांस्कृतिक सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाची सुरुवात लुईस ब्रेल यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. तत्पूर्वी, विद्यार्थ्यांनी गावातून भव्य रॅली काढली होती. "लुईस ब्रेल यांचा विजय असो", "शिक्षण आमच्या हक्काचे" अशा घोषणा देत या अंध विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले. रॅलींनंतर विद्यालयात मुख्य कार्यक्रम पार पडला, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी लुईस ब्रेल यांच्या जीवनावर आधारित प्रेरणादायी भाषणे केली आणि सुश्राव्य संगीताच्या माध्यमातून त्यांना आदरांजली वाहिली.

# वन विभागाने बिबट्याचा बंदोबस्त करावा

## अन्यथा शिवसेनेचे वाघ कार्यालयात सोडू - जिल्हाप्रमुख बबनराव बारसे

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यात सध्या बिबट्याने धुमाकूळ सुरू आहे वनविभाग बघायची झोपेचे सोंग घेत आहे. वनविभागाने तात्काळ कारवाई करावी अन्यथा शिवसेना स्टाईलने आंदोलन करून शिवसेनेचे वाघ वन विभागाच्या कार्यालयात सोडण्याचा इशारा ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांनी दिला आहे.

नांदेड जिल्ह्यात बिबट्याचा धुमाकूळ सुरू आहेत.वनविभाग व सरकार वेळकाढू धोरण अवलंबित आहे.तर बिबट्याच्या हल्ल्यामुळे शेतातील कामासाठी कोणीच रोजदार मिळत नाहीत सालगडी भितीमुळे कामे करीत नसल्याने शेतकरी वर्गात भितीचे वातावरणात असल्यामुळे शेतीतील कामे खोळंबली आहेत.



सरकार बिबट्याला जेरबंद करण्यासाठी कोणतेच पावले उचलत नाही. शासन व वनविभाग माणसे मरण्याची वाट बघत आहेत काय असा सवाल ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांनी केला आहे. अर्धापूर तालुक्यातील बारसगाव येथे बिबट्याने बैलावर हल्ला करून मारण्याचा प्रयत्न केला होता. या हल्ल्यात बैल गंभीर जखमी झाला असून बैलाला चाराही खाता येत नाही. बामणी शिवारात वासराच्या फट्या पडल्या होत्या.तर रोडगी,पांगरी,निमगाव शिवारात बिबट्याच्या हल्ल्यात अनेक जनावरे दगावली आहेत वन विभाग म्हणतो की हा बिबट्याचा हल्ला नसून दुसऱ्यास कशाने तरी हल्ला केल्याची बनवाबनवी करून वेळ मारून नेत आहेत.

मागील आठवड्यात बिबट्या निवघा शिवारात आढळल्याचे व्हिडिओ समाज माध्यमावर प्रसिद्ध झाले होते. वनविभाग कुंभकर्ण झोपेत असून माणसे मारल्याने बिबट्याचा बंदोबस्त करणार काय असा सवाल वनविभागाला जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांनी केला आहे पंधरा दिवसाच्या बिबट्याचा बंदोबस्त करा अन्यथा शिवसेनेचे वाघ वन विभाग कार्यालयास सोडू असा इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांनी वन विभागाला दिला आहे.

# निवडणूक प्रशिक्षणासाठी गैरहजर असलेले कर्मचारी प्रशिक्षणास हजर



**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 च्या पार्श्वभूमीवर मतदान केंद्रावर नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांचे प्रशिक्षण घेण्यात आले होते, परंतु या पहिल्या प्रशिक्षणास अनुपस्थित राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौरभ राव यांनी कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश दिले होते. या नोटीसी प्राप्त होताच संबंधित कर्मचारी दुसऱ्या प्रशिक्षणाचे आदेश घेण्यासाठी महापालिकेत स्थापन करण्यात आलेल्या निवडणूक आस्थापना विभागात हजर झाले आहे. निवडणूक प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व कायदेशीर पद्धतीने पार पाडण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण अत्यावश्यक असून, पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षण 27 ते 29 डिसेंबर 2025 या कालावधीत राम गणेश गडकरी रंगायतन व डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे आयोजित करण्यात आले होते.

# रेखाताई बनसोडे यांना संघर्ष नायिका पुरस्कार जाहीर

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**



अपेक्षित समाजाच्या न्याय हक्कासाठी व त्यांच्या सर्वांगीण परिवर्तनासाठी गेल्या अनेक वर्षापासून संघर्ष करणाऱ्या आणि सामाजिक कार्यात आपली एक वेगळी छाप निर्माण केलेल्या मौजे शेळगाव छत्री येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती रेखाताई बनसोडे देवकर यांना सत्यशोधक डॉ.अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सच्या वतीने संघर्ष नायीका पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. राष्ट्र महापुरुष यांनी समाजाच्या उत्थानासाठी आयुष्यभर संघर्ष केला त्यांच्या प्रगल्भ विचारांना संघर्षमय त्यागाना अधिष्ठान मानुन त्या दिशेने सातत्याने आपले सामाजिक काम गेल्या अनेक वर्षापासून अविरतपणे करणाऱ्या श्रीमती रेखाताई बनसोडे यांना अनाथाची आई म्हणून ओळखले जाते या व्यतिरिक्त गरजू गरीब लोकांना आपल्या परीने त्यांनी आजवर मदत करीत आलेल्या रेखाताई बनसोडे यांच्या संघर्षमय त्यागाची दखल घेऊन सत्यशोधक डॉक्टर अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्स या सामाजिक संघटनेने संघर्ष नायीका या पुरस्काराची घोषणा केली असून 31 जानेवारी रोजी ज्ञानमाता सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सिडको नांदेड येथे पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

# आपल्या हसण्याचं कॉमन रिजन! नव्या वर्षात, नव्या जोमाने सुरु होणार नवा सिझन!

## महाराष्ट्राची हास्यजत्रा' ५ जानेवारीपासून, दर सोम-मंगळ, रात्री ९ वाजता फक्त सोनी मराठी वाहिनीवर.

**(समर्थ गांवकरी)**

नवीन वर्षाची सुरुवात उत्साहात आणि आनंदात करण्यासाठी प्रेक्षकांवर अफाट प्रेम मिळवलेला कार्यक्रम "महाराष्ट्राची हास्यजत्रा" पुन्हा एकदा हास्याची धमाल घेऊन परत येत आहे. महाराष्ट्रातील लाखो कुटुंबांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या या शोचा नवीन सीझन ५ जानेवारीपासून दर सोम आणि मंगळवार रात्री ९ वा. सोनी मराठी वर प्रदर्शित होणार आहे. "आपल्या हसण्याचा नवा रिजन कारण येतोय नवा सिझन!"




नव्या वर्षात नवा सीझन – धमाल दुप्पट, एंटरटेनमेंट दुप्पट! नवीन वर्षाची सुरुवात सकारात्मकतेने करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्राला हास्याचा ताजातवाना डोस देण्याची जबाबदारी या शोने पुन्हा एकदा उचलली आहे. गेल्या अनेक सीझन्सपासून कुटुंबांना एकत्र बसून बिनधास्त हसण्याचं कारण देणाऱ्या या शोचे कलाकार, लेखक आणि दिग्दर्शक नव्या ऊर्जेसह सज्ज झाले आहेत.

या सीझनमध्ये प्रेक्षकांसाठी खास असे नव्या संकल्पनेवर आधारित नवे स्किट्स, नवीन व्यक्तिरेखा आणि खास नवीन ट्विस्ट आणि अर्थातच प्रेक्षकांच्या मनात घर केलेली मराठमोळी विनोदाची शैली, नवे विषय आणि नव्या प्रहसनासह हा सीझन आणखी भव्य, रंगतदार आणि मनोरंजक ठरेल अशी खात्री प्रेक्षकांना आहे. प्रेक्षकांचा आवडता ओंकार भोजने याने नुकताच महाराष्ट्राची हास्यजत्रा कार्यक्रमात पुनरागमन केले होते. त्याच्या नवीन प्रहसनाची देखील प्रेक्षक आतुरतेने वाट बघत होते आणि ततेच नवे विषय घेऊन ओंकार ५ जानेवारीपासून आपल्या भेटीस येत आहे.

'महाराष्ट्राची हास्यजत्रा'ने महाराष्ट्रातील प्रेक्षकांच्या दैनंदिन जीवनाचा एक अविभाज्य भाग बनलेला आहे. दिवसातील सगळी धावपळ, ताणतणाव विसरून लोक या शोसोबत मनमुराद हसतात. त्यामुळेच नवीन वर्षात शोच्या पुनरागमनाची घोषणा होताच प्रेक्षकांमध्ये उत्सुकता आणि आनंदाचे वातावरण आहे.

या शोमधील कलाकारांची केमिस्ट्री, त्यांचे लयबद्ध पंचेस, लोकजीवनाशी जोडणारे विषय आणि मानवी भावनांना स्पर्श करणारे विनोद हे सगळं असल्यामुळे 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' हा कार्यक्रम प्रेक्षकांचा पसंतीस पडत आहे. नवीन वर्ष म्हणजे नवीन सुरुवात आणि नवीन उत्साह. याच उत्साहाला सलाम करत 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'चा नवा सीझन प्रेक्षकांसमोर येत आहे. या कार्यक्रमाचा प्रयत्न नेहमीच कुटुंबांना एकत्र आणणे, हास्याने प्रेक्षकांचे मनोरंजन करणे हा आहे. नवीन सीझन प्रेक्षकांना दुप्पट मजा आणि दुप्पट एंटरटेनमेंट देईल.

५ जानेवारीपासून, दर सोम-मंगळवार, रात्री ९ वाजता 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' – फक्त सोनी मराठीवर! नव्या वर्षाची सुरुवात नव्या हसण्याने करा... कारण येतोय आपल्या हसण्याचं कॉमन रिजन! नव्या वर्षात, नव्या जोमाने सुरु होणार नवा सिझन!